दैनिक
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
# अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी
मुख्य संपादक : विनोद कैलास गोरे    Email : newsaksharaj2021@gmail.com
● वर्ष ०२ रे ● अंक १२४ वा ● पाने ०४ ● ठाणे, सोमवार, दि. २४ फेब्रुवारी २०२५ ● किंमत : ३ रुपये ● RNI NO.: MAHMAR/2022/82056




**आजचा सुविचार**

विचार करण्यासाठी वेळ द्या.
पण एकदा का कृती करण्याची वेळ आली
की, विचार करणे थांबवा
आणि स्वतःला कार्यात झोकून द्या.



## अनुभवी वाहन चालक हवे आहेत !!
इलेक्ट्रिक बस चालक कंत्राटी भरती
हंसा सिटी बस सर्व्हिसेस प्रा. लि. तुर्भे बस आगार, नवी मुंबई
: आवश्यक पात्रता :
- अवजड वाहन परवाना (Heavy License, PSV Badge) अनिवार्य
- किमान ३ वर्षांचा बस चालविण्याचा अनुभव (इलेक्ट्रिक/डिझेल)
- वय : २५ ते ४५ वर्षे

उत्तम पगार + अतिरिक्त भत्ते
कार्यस्थळ: एनएमएमटी तुर्भे, बस आगार, नवी मुंबई.
: संपर्क :
८६००७२५७०६
८३६९१२३४७५
९८२३८६०५८४
: ई-मेल :
evnavimumbai@hansagroupindia.com
operationnmmt@gmail.com
त्वरित अर्ज करा...
मर्यादित जागा उपलब्ध!

# वेगवेगळ्या सवलतींमुळे एसटीवर झाला ६४० कोटींचा बोजा !

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२३, मुंबई :** महिला, ज्येष्ठ नागरिकांना देण्यात येणाऱ्या सवलतींमुळे एसटी महामंडळाचा तोटा वाढल्याचे विधान परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांनी केल्याने टीका होऊ लागली असतानाच यंदाच्या आर्थिक वर्षाच्या १० महिन्यांत विविध सवलतींमुळे एसटी महामंडळाला ६४० कोटींचा तोटा सहन करावा लागला आहे.

एसटी महामंडळ सतत तोट्यातच आहे. या आर्थिक वर्षात मागील दहा महिन्यांत ऑगस्ट महिना वगळता प्रत्येक महिन्यात तोटाच झाला आहे. राज्य सरकारकडून १७ मार्च २०२३ पासून महिला सन्मान योजनेंतर्गत सवलतींमुळे एसटीवर ६४० कोटींचा बोजा. महिलांना बसमधून ५० टक्के सवलतीत प्रवास सुरू करण्यात आला. २०२३पासून आतापर्यंत ११५.१७ कोटी महिलांनी (एका फेरीत किती महिलांनी प्रवास केला त्या आधारे ही संख्या मोजली जाते) या सवलतीचा लाभ घेतला आहे. या सवलतींचा खर्च ३,५२७.७४ कोटी असून याची प्रतिपूर्ती राज्य सरकारकडून करण्यात येते. २०२४-२५ या आर्थिक वर्षात आतापर्यंत ५३.९१ कोटी महिलांनी एसटीने मोफत प्रवास केला असून १५०९ कोटी रुपयांच्या सवलतीचा लाभ घेतला आहे. प्रत्येक महिन्याला साधारण २ कोटी महिला या एसटी सवलतीचा लाभ घेत असतात. ही सवलतीच्या रक्कम महिन्याला १२५ ते १५० कोटी रुपये इतकी आहे.

ज्येष्ठ नागरिकांसाठीची सवलत २६ ऑगस्ट २०२२ पासून सुरू करण्यात आली. आतापर्यंत ५२.१५ कोटी ज्येष्ठ नागरिकांनी या सवलतीचा लाभ घेतला असून यासाठी २,६८२.३२ कोटींच्या खर्चाची प्रतिपूर्ती सरकारकडून करण्यात आली आहे. या आर्थिक वर्षात २१.८० कोटी ज्येष्ठ नागरिकांनी या सवलतीचा लाभ घेतला असून याचे सवलतमूल्य ११२६.५६ कोटी इतके आहे. ही सवलतीची रक्कम दर महिन्याला १००-१२० कोटी इतकी आहे.

या आर्थिक वर्षात आतापर्यंत एसटी महामंडळाला केवळ ऑगस्ट महिन्यात झालेला २२ कोटींचा नफा वगळता प्रत्येक महिन्याला तोट्याचा सामना करावा लागला आहे. यामध्ये सर्वाधिक तोटा हा सप्टेंबर महिन्यात १३१ कोटी तर ऑक्टोबर महिन्यात १६५ कोटी इतका झाला आहे. प्रतिपूर्तीपोटी सरकारकडून महामंडळाला ३८३५ कोटी मिळाले आहेत.

**टोलमध्ये सवलतीची मागणी**

एसटी महामंडळाकडून टोलमध्ये सवलतीची मागणी सरकारकडे करण्यात येत आहे. २०४ कोटींचा पथकर जात असल्याने त्यात सवलत मिळाल्यास एसटीचा तोटा कमी करण्यास मदत होणार आहे.

एसटी महामंडळाला तोट्यातून काढण्यासाठी विविध उपाययोजना केल्या जात आहेत. यात पहिल्यांदा जाहिरातीचे उत्पन्न वाढविण्यावर भर दिला जात आहे. त्याचप्रमाणे अनावश्यक खर्चात कपात करण्यावर भर देण्यात येत आहे. राज्य सरकार तसेच अन्य देण्यांपोटी साडेपाच हजार कोटींची देणी येणे आवश्यक आहे. वित्त मंत्री अजित पवार यांच्याकडे या अर्थसंकल्पात ही देणी देण्याबाबत विनंती करण्यात आली आहे.

**- प्रताप सरनाईक, परिवहनमंत्री**

## थोडक्यात

### रवींद्र धंगेकरांना शिवसेनेची ऑफर?



**दि.२३, मुंबई :** काँग्रेसचे माजी आमदार रवींद्र धंगेकर यांचं एक व्हॉट्सअ‍ॅप स्टेट्स सध्या चांगलंच चर्चेत आलं आहे. रवींद्र धंगेकर यांनी ठेवलेल्या व्हॉट्सअ‍ॅप स्टेट्समधील फोटोत त्यांनी गळ्यात भगवं उपरणं परिधान केल्याचं पाहायला मिळालं. त्यांचं हे स्टेट्स चांगलंच व्हायरलं झालं. त्यामुळे रवींद्र धंगेकर यांच्या मनात नेमकं काय चाललंय? याबाबत अनेकांनी सवाल उपस्थित केले. मात्र, आता यावर शिवसेना (शिंदे) पक्षाचे नेते तथा मंत्री उदय सामंत यांनी आज (२३ फेब्रुवारी) माध्यमांशी बोलताना एक मोठं विधान करत रवींद्र धंगेकर यांना थेट पक्षात येण्याची ऑफर दिल्याचं सांगितलं. मी कालच रवींद्र धंगेकर यांना पक्षात येण्याचं निमंत्रण दिलं आहे, असं मंत्री उदय सामंत यांनी म्हटलं आहे.

**उदय सामंत काय म्हणाले?**

रवींद्र धंगेकर यांनी काल गळ्यात भगवं उपरणं परिधान केलेला फोटो व्हॉट्सअ‍ॅप स्टेट्सला ठेवला होतं असं मी पाहिलं. त्याबाबत मी काल बोललो की त्यावर धनुष्यबाण आला तर आम्हाला आवडेल. तसेच मी कालच रवींद्र धंगेकर यांना निमंत्रण दिलं आहे. कारण त्यांच्या सारख्या सर्वसामान्य एका कार्यकर्त्याला जर ताकदीने काम करायचं असेल आणि सामाजिक क्षेत्रात काम करायचं असेल तर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशिवाय पर्याय नाही. असं मी त्यांना निमंत्रण दिलेलं आहे, असं उदय सामंत यांनी माध्यमांशी बोलताना म्हटलं आहे.

**रवींद्र धंगेकरांचं स्टेट्स काय होतं?**

माजी आमदार रवींद्र धंगेकर यांनी त्यांच्या स्टेट्सला गळ्यात भगवं उपरणं घातलेला एक फोटो ठेवला होता. तसेच त्या फोटोवर स्टेट्सला 'तेरे क़दमों के तले मिट्टी भी सोना बन गयी, जर हुआ दुश्मन जहाँ शमशीर तेरी तन गयी' हे गाणे ठेवलं होतं. त्यामुळे रवींद्र धंगेकर यांच्या स्टेट्सची मोठी चर्चा रंगली. तसेच रवींद्र धंगेकर हे काँग्रेस सोडणार असल्याच्या चर्चा रंगल्या.

**धंगेकरांनी काही दिवसांपूर्वी शिंदेंची भेट घेतली होती**

रवींद्र धंगेकर यांनी काही दिवसांपूर्वी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची मुंबईत भेट घेतली होती. रवींद्र धंगेकर यांनी अचानक घेतलेल्या या भेटीमुळे चर्चांना उधाण आलं होतं. मात्र, त्यानंतर या भेटीबाबत स्पष्टीकरण देताना आपण वैयक्तिक कामाच्या संदर्भात भेट घेतल्याचं स्पष्टीकरण रवींद्र धंगेकर यांनी दिलं होतं. माझ्या वैयक्तिक कामासाठी मी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेतली. एकनाथ शिंदे यांची भेट घेतल्यानंतर मी त्यांना माझ्या वैयक्तिक कामाचं स्वरुप सांगितलं, तेव्हा ते काम करून देतो बोलले. त्यांच्याकडे काम असल्यामुळे मला त्यांना भेटण्याची गरज पडली, असं रवींद्र धंगेकर तेव्हा म्हणाले होते.

# ५५ वर्षाच्या व्यक्तीचा नववीच्या विद्यार्थिनीवर बलात्कार

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२३, नागपूर :** ५५ वर्षीय व्यापाऱ्याने मित्राच्या १५ वर्षीय मुलीला महागडे कपडे, गिफ्ट, चॉकलेट देऊन प्रेमाच्या जाळ्यात ओढले. तिला कारने सौंसरमध्ये नेऊन रात्रभर बलात्कार केला. दुसऱ्या दिवशी मुलीचे आईवडिल पोलीस ठाण्यात पोहचले. त्यामुळे त्याने मुलीला घरी सोडून पळ काढला. या प्रकरणी कोंढाळी पोलिसांनी अपहरण आणि बलात्काराचा गुन्हा दाखल करुन आरोपीला अटक केली. संजय ससाने (५५, सिंजर, ता. नरखेड) असे आरोपी व्यापाऱ्याचे नाव आहे.

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, १५ वर्षीय मुलगी तनुजा (बदललेले नाव) ही कोंढाळी पोलीस ठाण्याच्या हद्दीत आईवडिल व लहान भावासह राहते. आरोपी संजय ससाने कापूस खरेदी-विक्री करणारा व्यापारी आहे. तो तनुजाच्या वडिलाचा मित्र आहे. त्याला पत्नी व दोन मुले आहेत. त्यामुळे त्याचे नेहमी तनुजाच्या घरी येणे-जाणे होते.

संजय श्रीमंत असल्यामुळे तो नेहमी मित्राच्या घरी आल्यानंतर काहीतरी गिफ्ट, चॉकलेट घेऊन येत होता. तनुजाचे तो नेहमी कौतूक करीत होता. दरम्यान, त्याला १५ वर्षीय तनुजा आवडायला लागली. त्याने तिला खुश करण्यासाठी नेहमी महागडे कपडे घेऊन देत होता. त्यामुळे तीसुद्धा वडिलाच्या मित्राच्या प्रेमात पडली.

तिच्या वडिलांना घर बांधायचे असल्यामुळे त्यांना ५० हजार रुपयांचे कर्ज दिले. त्याने तिला महागडा मोबाईल घेऊन दिला. दोघेही संपर्कात राहू लागले. तनुजाचे आईवडिल घरी नसताना तो घरी यायला लागला. दरम्यान, तिला त्याने प्रेमाच्या जाळ्यात ओढले. घरी कुणी नसताना तो तिच्याशी शारीरिक संबंध प्रस्थापित करायला लागला.

अल्पवयीन असलेल्या तनुजाला त्याने लग्न करण्याचे आमिष दाखवले.



तिला तो शहरात फिरायला नेऊन तिच्यावर पैसे उडवायला लागला. तो वारंवार घरी येत असल्यामुळे मुलीच्या वडिलांना संशय आला.मुलीचे मित्रासोबत प्रेमप्रकरण असल्याची कुणकुण वडिलांना लागली. शेजाऱ्यांमध्ये दोघांच्या प्रेमप्रकरणाची चर्चा व्हायला लागली. त्यामुळे तिच्या वडिलाने मुलीला मावशीच्या घरी काही दिवसांसाठी नेऊन ठेवले.

**कारमधून नेले पळवून...**

तनुजाला मावशीकडे ठेवल्यामुळे संजय तणावात आला. त्याने व्यापारी मित्र सुरेश ढोपरे याला हाताशी धरुन तनुजाला पळवून नेण्याचा कट रचला. त्याने मध्यप्रदेशातील सौंसर येथे एक भाड्याने खोली घेतली. २० फेब्रुवारीला रात्री बारा वाजता सुरेश ढोपरेने तिला मावशीच्या घरातून बाहेर बोलावले. कारमध्ये बसवून जामखेडला आणले. तेथून संजय हा तनुजाला घेऊन सौंसरमधील खोलीवर गेला. तेथे तनुजावर रात्रभर त्याने बलात्कार केला आणि दुसऱ्या दिवशी तो घराकडे परतला.


**असा झाला प्रेमप्रकरणाचा उलगडा...**

वडिलांनी मुलीच्या अपहरण केल्याची तक्रार कोंढाळी पोलीस ठाण्यात दिली. ठाणेदार राजकुमार त्रिपाठी यांनी तपासात संजय ससानेला ताब्यात घेतले. त्याने सुरुवातीला नकार दिला. मात्र, त्याला पाहुणचार देताच त्याने तनुजाला सौंसरमधील घरी ठेवल्याची कबुली दिली. तेथून मुलीला ताब्यात घेतले. मुलीने लैंगिक अत्याचार केल्याची तक्रार केली. त्यामुळे आरोपी संजय ससानेला अटक केली तर त्याचा साथिदार सुरेश ढोपरे फरार झाला आहे.

# परिवहन मंत्र्यांनी दिले महत्त्वाचे आदेश ! महाराष्ट्रातील एसटीवर कर्नाटकात झाला होता हल्ला

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२३, मुंबई :** राज्यातील एसटी बसवर कर्नाटकात हल्ला झाल्यानंतर महाराष्ट्राचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी शनिवारी कर्नाटकला जाणाऱ्या राज्य परिवहन बसेस बंद करण्याचे आदेश दिले. सरनाईक म्हणाले की, बंगळुरूहून मुंबईला जाणाऱ्या महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या बसवर शुक्रवारी रात्री ९.१० वाजता चित्रदुर्गात कन्नड समर्थक कार्यकर्त्यांनी हल्ला केला. त्यांनी चालक भास्कर जाधव यांचा चेहऱ्यावरही काळे फासले आणि त्यांच्यावर हल्ला केला, असं सरनाईक यानी सांगितले.



या कथित हल्ल्याप्रकरणी कर्नाटकात पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जोपर्यंत कर्नाटक सरकार या महामंडळाच्या मुद्द्यावर आपली भूमिका स्पष्ट करत नाही तोपर्यंत कर्नाटकला जाणारी बस सेवा पुन्हा सुरू केली जाणार नाही, असे ते म्हणाले. तसंच, एका मुलीला मराठीत उत्तर न दिल्याबद्दल कर्नाटकच्या राज्य परिवहन बसच्या कंडक्टरला बेळगावी मारहाण करण्यात आली. चित्रदुर्गात एमएसआरटीसी बसवरील हल्ला हा कंडक्टरवरील कथित हल्ल्याचा बदला होता की नाही हे स्पष्ट झालेले नाही. सरनाईक म्हणाले की, एमएसआरटीसी बस चित्रदुर्ग ओलांडत असतानाच कन्नड समर्थक कार्यकर्त्यांनी गाडीवर हल्ला केला.

**बेळगावी येथे नेमकं काय घडलं?**

बेळगावी येथे कंडक्टरवर हल्ला केल्याच्या आरोपाखाली आणखी एका प्रकरणात चार जणांना अटक करण्यात आली आहे, असे पोलिसांनी सांगितले.

कंडक्टरवर लैंगिक गुन्ह्यांपासून मुलांचे संरक्षण कायद्याअंतर्गतही गुन्हा दाखल करण्यात आला आहे, असे त्यांनी सांगितले. शुक्रवारी ५१ वर्षीय कंडक्टर महादेवप्पा मल्लप्पा हुक्केरी यांनी डोळ्यात अश्रू आणत पत्रकारांना सांगितले की, सुलेभावी गावात एक मुलगी तिच्या मित्राबरोबर बसमध्ये चढली. ती मराठीत बोलत होती. त्यामुळे मी तिला सांगितलं की मला मराठी येत नाही, कन्नडमध्ये बोल. मी जेव्हा मराठी येत नाही असे सांगितले तेव्हा त्या मुलीने मला शिवीगाळ केली आणि म्हटले की मला मराठी शिकावे लागेल. अचानक मोठ्या संख्येने लोक जमले आणि त्यांनी माझ्या डोक्यावर आणि संपूर्ण शरीरावर हल्ला केला, असे कंडक्टर म्हणाला.

# मतदारांनी दहशत मोडून काढली : आ. काशिनाथ दाते

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२३, पारनेर (अहिल्यानगर) :** खासदारकीच्या माध्यमातून जिल्ह्यात दहशतीची किड पसरली होती. ती थांबवण्याचे काम नगर-पारनेर विधानसभा मतदारसंघांतील सुज्ञ मतदारांनी केल्याने जिल्हा शांत झाला आहे. जनतेने आपल्यावर जो विश्वास टाकला आहे. त्याला तडा जाऊ न देता विकासकामे मोठ्या प्रमाणात करणार असल्याची ग्वाही आ. काशिनाथ दाते यांनी दिली.

देवीभोयरे येथे ग्रामस्थांच्या वतीने झालेल्या नागरी सत्कार कार्यक्रमात ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. भाऊसाहेब खिलारी होते. अंबिका देवीच्या मंदीरात गावचे माजी उपसरपंच विकास सावंत व त्यांच्या सहकाऱ्यांनी केलेल्या नवसाची नवसपूर्ती गुळतुला करुण करण्यात आली. यावेळी भाजप नेत विश्वनाथ कोरडे, तालुकाध्यक्ष राहुल शिंदे पाटील, माजी नगराध्यक्ष विजय औटी, राष्ट्रवादीचे जिल्हा उपाध्यक्ष रखमाजी



कापसे, तालुकाध्यक्ष विक्रम कळमकर, युवा तालुकाध्यक्ष भास्करराव उचाळे, युवा नेते दिलीप दाते, भाजपचे जिल्हा सरचिटणीस सुभाष दुधाडे, भाजपचे सांस्कृतिक सेलचे तालुकाध्यक्ष विलासराव हारदे आदींसह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**तालुका दहशतीखाली होता**

आ. दाते म्हणाले, गेली पाच वर्षे तालुका दहशतीखाली होता. मात्र गेली ४० वर्षात आपण जे सामाजिक काम केले त्यावर विश्वास ठेऊन जनतेने दहशत मोडून काढीत निवडून दिले. त्यामुळे तालुक्यातील पाट पाण्याचे प्रश्न सोडविण्यासाठी आपण प्राधान्य देणार आहे. विधानसभेत लक्षवेधी मांडून विविध सुचना केल्याची दखल राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतली असून प्रश्न तातडीने मार्गी लागणार आहेत. कुकडी डावा कालवा व पिंपळगाव जोगा कालवा हे अस्तारीकरणाचा प्रश्न मार्गी लागला असून जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी प्रत्यक्ष पाहणी करीत मंजूर केला असून लवकरच हे काम सुरू होणार आहेत.

**पिंपळगाव जोगाबाबत आळकुटीत बैठक**

माजी खासदार डॉ सुजय विखे पाटील यांनी गेली पाच वर्षात कोट्यवधी रुपयांची विकासकामे केली आहे. ३८६ कोटी रुपयांच्या आळेफाटा ते शिरूर रस्त्यासाठी निधी मंजूर केला असून लवकरच शुभारंभ होणार आहे. मात्र विरोधकांनी अपप्रचार करून जनतेमध्ये संभ्रम निर्माण करण्याचा प्रयत्न केला. तालुक्यातील विकासकामांसाठी आपण सातत्याने पाठपुरावा करून विकासकामे करणार असल्याची ग्वाही त्यांनी दिली. तसेच पिंपळगाव जोगा धरणाचे काम मार्गी लावण्यासाठी रविवारी अळकुटी येथे बैठक घेणार असल्याची माहिती दाते यांनी दिली.

**विकासाला गती येणार : डॉ.खिलारी**

यावेळी जेष्ठ नेते डॉ भाऊसाहेब खिलारी यांनीही आमदार दाते यांचा गौरव करीत तालुका विकासाला गती येणार असल्याचे सांगितले. दाते सर यांच्याकडे संयम आणि विकासासची दृष्टी आहे. त्यामुळे तालुका निश्चितपणे विकासाकडे वाटचाल करीत आहे. गेल्या पाच वर्षात जो विकासाचा अनुशेष तयार झाला आहे तो दाते सर निश्चित भरून काढतील असे डॉ भाऊसाहेब खिलारी म्हणाले.


# १० वर्षांत मुंबईत मनपाच्या १०० मराठी शाळा बंद

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२३, मुंबई :** एका बाजूला मराठी भाषेचे संवर्धन होण्यासाठी सरकार आणि साहित्य वर्तुळात प्रयत्न होत आहेत. नुकतेच राज्य सरकारने सर्व शासकीय आणि निम-शासकीय कार्यालयात मराठी भाषा अनिवार्य केली. तसेच दिल्ली येथे होत असेलल्या ९८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात मराठी भाषेचा गजर करण्यात आला. मात्र दुसऱ्या बाजूला मराठी माध्यमांच्या शाळांची संख्या मात्र रोडावत चालली आहे. मुंबई महनगरपालिकेने नुकतेच 'युनिफाइड डिस्ट्रिक्ट इनफॉर्मेशन सिस्टिम फॉर एज्युकेशन (यूडीआयएसई)' कडे शाळांची माहिती संकलित करून दिली. या आकडेवारीतून मागच्या दशकभरातील मराठी माध्यमांच्या शाळांची दुर्दशा दिसून आली आहे. द इंडियन एक्सप्रेसने यासंबंधीचे वृत्त दिले आहे. २०१४-१५ या शैक्षणिक वर्षात मुंबई महानगरपालिका मराठी माध्यमाच्या ३६८ शाळा चालवत होती. आता २०२३-२४ या शैक्षणिक वर्षात शाळांची संख्या २६२ वर आली. १० वर्षांत १०० शाळा बंद झाल्या आहेत. मराठी शाळांचा टक्का घसरत असल्यामुळे शिक्षक वर्ग आणि मराठी भाषेसाठी आग्रही असणाऱ्या सामाजिक धुरीणांमध्ये चिंतेचे वातावरण आहे. विशेषतः २७ फेब्रुवारी रोजी मराठी भाषा दिन साजरा केला जाणार असताना अनेकांना मुंबईतून मराठी भाषेचा ऱ्हास होत असल्याची भीती वाटते. पालकांचा कल बदलला असल्यामुळे मराठी शाळांना उतरती कळा लागल्याचे मुंबई मनपाचे शिक्षण अधिकारी राजेश कंकाळ यांनी द इंडियन एक्सप्रेसशी बोलताना सांगितले. ते म्हणाले, अनेक पालकांना इंग्रजी माध्यमांच्या शाळा खुणावू लागल्या आहेत. ज्यांना तिथे प्रवेश मिळत नाही, ते दुसरा पर्याय म्हणून मराठी माध्यमाची शाळा निवडतात. तथापि मागच्या तीन वर्षांत मुंबई महानगरपालिकेच्या मराठी माध्यमाच्या शाळांमधील प्रवेश संख्येत वाढ झाल्याचे त्यांनी नमूद केले. काही शिक्षकांच्या मतानुसार, मराठी माध्यमाच्या शाळा टिकवून ठेवण्यासाठी महापालिकेने काही सक्रिय पावले उचलण्याची आवश्यकता आहे. मुंबई मनपा संचालित मराठी शाळेच्या मुख्याध्यापकांनी सांगितले, पालक इंग्रजी शाळांना प्राधान्य देत आहेत, म्हणून मराठी शाळा बंद करणे कितपत योग्य आहे? मराठी शाळा टिकवण्याची जबाबदारी सरकारने उचलली पाहीजे. सरकारच्या धोरणावर इतर शिक्षकही प्रश्नचिन्ह उपस्थित करत आहेत. अमराठी शाळांवर मराठी भाषा शिकविण्याची सक्ती करण्यापेक्षा सरकारने मराठी माध्यमाच्या शाळा आणखी कशा सुधारतील, याकडे लक्ष दिले पाहिजे.

फेब्रुवारी महिन्याच्या सुरुवातीला राज्य सरकारने सरकारी आणि निम सरकारी कार्यालयात मराठी भाषेचा वापर अनिवार्य केला. गेल्या वर्षी केंद्र सरकारने मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा दिल्यानंतर राज्य सरकारने व्यापक मराठी भाषा धोरणाला मान्यता दिली, त्याचाच हा भाग असल्याचे सांगितले जाते.

# संपादकीय



## व्हॉट्सअप वाढदिवस!

आजचे युग हे सोशल मिडियाचे युग आहे आणि या सोशल मीडियाच्या युगात प्रत्येकाच्या मोबाईल मध्ये अनेक मेसेजिंग ॲप्लिकेशन आहेत आपणही दररोज अनेक मेसेजिंग ॲप्लिकेशनचा वापर करतो. या मेसेजिंग ॲप्लिकेशनमध्ये सर्वाधिक लोकप्रिय आणि सर्वाधिक वापरले जाणारे मेसेजिंग ॲप्लिकेशन म्हणजे व्हाट्सअप. याच सर्वाधिक लोकप्रिय आणि वापरले जाणाऱ्या व्हॉट्सअप या मेसेजिंग ॲप्लिकेशनचा आज वाढदिवस आहे. व्हॉट्सअप हा आज परवलीचा शब्द झाला आहे. आज प्रत्येकाच्या मोबाईलमध्ये दुसरे कोणते ॲप्लिकेशन असो वा नसो पण व्हॉट्सअप हमखास बघायला मिळते. २४ फेब्रुवारी २००९ रोजी जेन कॉम याने व्हाट्सअप ळपल नावाची कंपनी स्थापन केली. व्हाटसअपचा निर्माता जेन कॉम याचा जन्म युक्रेन देशातील छोट्या गावात झाला. त्याचे वडील मजूर तर आई गृहिणी होती. युक्रेनमध्ये राजकीय अस्थिरता निर्माण झाल्यावर त्याचे वडील अमेरिकेत स्थलांतरित झाले. तिथे ते छोटीमोठी कामे करू लागले. जेन कॉम याला कॉम्प्युटर प्रोग्रामिंगची आवड होती. त्याच्या घराजवळच एक लायब्ररी होती. तेथून तो कॉम्प्युटर प्रोग्रामिंगचे पुस्तके आणत व घरच्या कॉम्प्युटरवर प्रोग्रामिंग करीत. पुढे त्याने कॉम्प्युटर सायन्समध्ये डिग्री मिळवून एका सॉफ्टवेअर कंपनीत सिक्युरिटी टेस्टर म्हणून काम सुरू केले. १९९७ साली याहू कंपनीने इन्फ्रास्ट्रक्चर इंजिनिअर या पदावर त्याची नेमणूक केली. या कंपनीत त्याने ९ वर्ष नोकरी केली. दुसऱ्या कंपनीत नोकरी करण्यापेक्षा स्वतःची कंपनी सुरू करावी या विचाराने त्याने याहूला राजीनामा दिला. याहूमध्ये ब्रायन अकटन हा त्याचा सहकारी होता. त्यानेही याहूला राजीनामा दिला. दोघांनी मिळून स्वतःची कंपनी स्थापन करण्याचे ठरवले. त्या सुमारास ॲप्पल कंपनीने आयफोन बाजारात आणला होता. त्यात मेसेज पाठवण्याची सुविधा होती. त्यावरून त्यांना व्हॉट्सअपची कल्पना सुचली. पुढे दोघांनी त्यावर काम करण्यास सुरवात केली. या प्रयोगात त्यांना यश मिळाले का नाही हे विचारण्यासाठी त्यांच्या मित्राने त्यांना विचारले व्हॉट्सअप ! व्हॉट्सअप या शब्दाचा अर्थ होतो काय झाले ? हा शब्द कानावर पडता क्षणीच त्यांनी ठरवले आपल्या कंपनीचे नाव आपण व्हॉट्सअप हेच ठेवायचे. २४ फेब्रुवारी २००९ रोजी त्यांनी व्हॉट्सअप ळपल नावाची कंपनी स्थापन केली. सुरवातीला व्हॉट्सअपला खूपच कमी प्रतिसाद मिळाला कारण तेंव्हा अँड्रॉइड मोबाईलची संख्या खूप कमी होती पण जशी अँड्रॉइड मोबाईलची संख्या वाढत गेली तशी व्हॉट्सअप वापरणाऱ्यांची संख्याही वाढत गेली. आज व्हॉट्सअप जगातील पहिल्या क्रमांकाचे एप्लिकेशन बनले आहे. जगातील किमान दोनशे कोटीहून अधिक लोक व्हॉट्सअपचा वापर करतात. प्रत्येकाच्या मोबाईलमध्ये व्हॉट्सअप असतेच. व्हॉट्सअपवर रोज एक लाख कोटीहून अशिक मेसेज सेंड होतात. व्हॉट्सअप वरुन दररोज ५०० कोटीहून अधिक फोटो तसेच १०० कोटीहून अधिक व्हिडीओ शेअर होतात. सुरवातीला फक्त इंग्रजीमध्ये असणारे व्हॉट्सअप आज ५३ भाषांमध्ये आहे. व्हॉट्सअप नेहमीच नवनवीन सुविधा वापरकर्त्यांसाठी उपलब्ध करुन देते. व्हिडिओ कॉल, ऑडियो कॉल, स्टेटस अशा नवनवीन सुविधा व्हॉट्सअप कडून वापरकर्त्यांना देण्यात आल्या आहेत. आज व्हॉट्सअप वरून पैसेही पाठवता येऊ शकतात. २०१४ साली फेसबूकच्या मार्क झुकेरबर्ग याने १९ बिलियन डॉलरला जेन कॉम आणि ब्रायन अकटन यांच्याकडून व्हॉट्सअप खरेदी केले. आज व्हॉट्सअपची मालकी मार्क झुकेरबर्ग यांच्याकडे आहे. आज व्हॉट्सअप प्रत्येकाच्या जीवनातील अविभाज्य घटक बनला आहे. आपली दिवसाची सुरुवात व्हॉट्सअपनेच होते. सकाळी झोपेतून उठल्यावर आपण जर पहिल्यांदा काय पाहत असतो तर ते व्हॉट्सअप !आपण झोपताना ही व्हॉट्सअप पाहूनच झोपतो. व्हॉट्सअप वर ग्रुपची सुविधा सुरू झाल्याने एकाच वेळी शेकडो लोकांना मेसेज पाठवण्याची सुविधा निर्माण झाली. व्हॉट्सअप वर आज कोयावधी ग्रुप आहे. केवळ मित्रांचे नातेवाईकांचे च नाही तर शासकीय नोकरांचे देखील ग्रुप आहे. शासकीय संदेश, आदेश देखील आता व्हॉट्सअप वर दिले जातात. लहान मुलांपासून थोरांपर्यंत सर्वांच्या जीवनाच्या अविभाज्य भाव बनलेल्या व्हॉट्सअपला वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!

## बनवा उपवासाचे हेल्दी-टेस्टी वरईचे आप्पे

नवरात्रीनिमित्त नऊ दिवस उपवास असल्याने रोज काय बनवयाचे, असा प्रश्न अनेकांना पडतो. त्यात रोज साबुदाणा खिचडी, राजगिऱ्याचा लाडू, रताळे, बटाट्याचे वेफर्स, भगरीची भाकरी, असे तेच तेच पदार्थ खाऊन कंटाळा येतो. त्यामुळे आम्ही तुम्हाला उपवासाचे अप्पे कसे बनवायचे हे सांगणार आहोत. जे तुम्ही नवरात्रीत उपवास असेल, तर नक्की आजमावून पाहा.



**वरईचे आप्पे साहित्य :**

- १ कप वरई
- पाव कप साबुदाणा
- ३ कप दही
- जिरे
- मीठ
- हिरव्या मिरचाच ठेचा

**वरईचे आप्पे कृती :**

- सर्वप्रथम साबुदाणा मिक्सरला दळून घ्यायचा. दळून झाल्यानंतर त्यामध्ये वरई घालून पुन्हा मिक्सरला एकदा फिरवून घ्यावे.
- मग साबुदाणा आणि वरई मिश्रण एका बाउलमध्ये काढून घ्यावे. त्यानंतर त्यामध्ये दही व्यवस्थित मिक्स करून घ्यायचे.
- मग त्यामध्ये एक चमचा जिरे, हिरव्या मिरचीचा ठेचा, चवीनुसार मीठ घालायचे. त्यानंतर मिश्रणात थोडं पाणी घालून ते व्यवस्थित मिक्स करायचं.
- अशा प्रकारे तुम्ही उपवासाच्या आप्प्यांचे पीठ तयार करा. **(टिप – पीठ जास्त पातळं आणि जास्त घट्ट नको)** आप्प्यांचं पीठ तयार झाल्यानंतर ते १५ , २० मिनिटं झाकून बाजूला ठेवून द्यायचे.
- त्यानंतर आप्पे पात्र गरम करून त्यामध्ये तेल सोडा आणि जे बॅटर तयार करून घेतलं आहेत ते आप्पे पात्रात घाला.
- मग झाकणं ठेवून ते २ ते ३ मिनिटे शिजवून घ्यायचे आणि पुन्हा त्यात तेल सोडून दोन्ही बाजूने नीट भाजून घ्यायचे.
- अशा प्रकारे तुमचे उपवासाचे आप्पे तयार सर्वांना सर्व्ह करा.

# ...तरच मातृभाषा संपन्न होईल !

नुकताच जागतिक मातृभाषा दिन संपन्न झाला. आजमितीला जागतिक पातळीवर सात हजाराहून अधिक मातृभाषा आहेत तर केवळ भारतात २२ प्रमुख भाषांसह सुमारे १३०० मातृभाषा आहेत. झपाट्याने होणारे जागतिकीकरण, तंत्रज्ञानाचा वाढता वापर आणि अन्य भाषांनी मातृभाषेवर केलेली कुरघोडी यांमुळे अनेक मातृभाषा लोप पावत चालल्या आहेत. मातृभाषेचे संवर्धन व्हावे आणि त्या भाषेची संस्कृती टिकून राहावी यासाठी १९९९ पासून २१ फेब्रुवारी हा दिवस जागतिक मातृभाषा दिवस म्हणून साजरा केला जाऊ लागला आहे. एकाच मातृभाषेतील लोकांनी एकत्र येऊन मातृभाषेतील शिक्षण, साहित्य आणि संस्कृती यांबाबत चर्चा करून तिच्या संवर्धनासाठी ठोस कार्यक्रम आखावेत हा यामागील प्रमुख उद्देश आहे. सर्वाधिक भाषा बोलले जाणारे भारत हे जगातील एकमेव राष्ट्र असून भारतातही काही मातृभाषा लुप्त होण्याच्या मार्गावर आहेत, तर काहींचा व्यवहारात होत असलेला वापर कमी होत चालला आहे. २१ फेब्रुवारीला जागतिक मातृभाषा दिन आणि २७ फेब्रुवारीला मराठी राजभाषा दिवस म्हणून राज्यात उत्साहाने साजरा केला जातो. या दिवशी समस्त मराठी भाषिक मंडळींकडून व्हाट्सअप वर मराठी भाषा दिनाच्या शुभेच्छा दिल्या जाता, मराठी भाषेचे गोडवे गाणाऱ्या कविता, गाणी आणि सुविचार सामाजिक माध्यमांच्या स्टेटस आणि स्टोऱ्यांवर ठेवले जातात. काही मंडळी या दिवशी एकमेकांशी आवर्जून मराठीत संवाद साधतात. सामाजिक संस्था, मंडळे, राजकीय पक्ष विविध उपक्रम राबवतात आणि त्यानिमित्ताने मराठी भाषेचे महत्व सांगणारी व्याख्याने दिली जातात. २७ फ ब्रुवारीला शाळांतूनही मराठी राजभाषा दिवस उत्साहाने साजरा केला जातो मात्र दिवस सरला की दुसऱ्या दिवशी पुन्हा येरे माझ्या मागल्या.

इंग्रजी भाषेने मातृभाषांवर केलेली घुसखोरी ही आज एक जटील समस्या बनली आहे. व्यवहारात पुढे जायचे असेल, तर इंग्रजीला पर्याय नाही हा मोठा गैसमज भारतीय जनतेत निर्माण झाल्यामुळे आज इंग्रजी आणि कॉन्व्हेंट शाळांमध्ये आपल्या पाल्यांना घालणाऱ्यांचे प्रमाण कमालीचे वाढले आहे. महाराष्ट्रात त्यातही राज्यातील प्रमुख शहरांमध्ये हे प्रमाण वर्षागणिक वाढू लागले आहे, पाल्यांना इंग्रजी भाषा शिकण्यासाठी आणि त्यांचे इंग्रजीवर प्रभुत्व निर्माण होण्यासाठी पालकांकडून अतिरिक्त शिकवण्या लावल्या जातात. इंग्रजी भाषेचा सराव व्हावा यासाठी घरातही मुलांना इंग्रजीत संवाद साधण्याची सक्ती केली जाते. परिणामी मातृभाषा मराठी असूनही अशा मुलांना मराठी भाषा परकीय वाटू लागते. मराठी भाषेचे सौंदर्य आणि त्यातील पैलू यांना कधी उमगतच नाहीत. लहानपणापासूनच परकीय भाषेचे कित्ते गिरवल्याने मातृभाषेतील परवलीचे शब्द वगळता अन्य शब्दांचे ज्ञान या पिढीकडे मुळातच नसते. मातृषेतील शब्दभांडार, त्यातील सौंदर्य आणि त्यातील लेखन संपदा यांपासून ही पिढी दुरावू लागली आहे. हे असेच चालू राहिले, तर येणाऱ्या काही वर्षांत मराठी मातृभाषा औषधालाही शिल्लक राहील का, हा प्रश्नच आहे. मातृभाषेच्या संवर्धनासाठी व्यवहारिक पातळीवर इंग्रजीचे वाढलेले अवास्तव महत्व कमी करण्याची आवश्यकता असून राज्य पातळीवर मातृभाषेचाच अधिकाधिक वापर केला जायला हवा आणि त्यासाठी मातृभाषेविषयी पालकांमध्ये जागृती होणे अत्यंत महत्वाचे आहे.

मूळ मराठी भाषेवर देववाणी संस्कृतचा प्रभाव असल्याने ती अधिक समृध्द आणि प्रगल्भ आहे. तिच्या प्रत्येक शब्दामध्ये अर्थ दडलेला आहे. राज्यातील संस्कृतीवर आरंभी इस्लामी आणि नंतर इंग्रजी आक्रमकांनी हल्ले केल्यामुळे येथील सध्याच्या बोली भाषेवर उर्दू आणि इंग्रजी भाषेचा प्रभाव अधिक जाणवतो. आपल्या नेहमीच्या बोलण्यातही एका वाक्यात दोन ते तिन परकीय शब्द आपण सहजपणे उच्चारत असतो. छत्रपती शिवाजी महाराजांनी राज्याभिषेक केल्यानंतर, मराठी भाषाशुद्धीचे प्रयत्न युद्धपातळीवर केले. परकीय शब्दांना हद्दपार केले. त्यानंतर स्वातंत्र्यवीर सावरकरांनीही मराठी भाषेला तिचे गतवैभव प्राप्त करून देण्यासाठी आणि तिचे सौंदर्य खुलवण्यासाठी आपल्या कार्यकाळात अथक प्रयत्न केले. बोलीभाषेतील परकीय शब्द शोधून त्यांना पर्यायी मराठी शब्द शोधून काढले. त्यानंतरही अनेकांनी भाषाशुद्धीसाठी प्रयत्न केले आहेत. या सर्वांचे योगदान लक्षात घेऊन आपणही आपल्या मायमराठीला तिचे मूळ स्वरूप प्राप्त करून देण्यासाठी प्रयत्न करायला हवेत, जेणेकरून येणारी पिढी आपला वारसा पुढे चालवेल.

आपल्या मालकीच्या वस्तूंविषयी आपली आसक्ती असते मग आपल्या मातृभाषेविषयी आपल्या मनात आकस का ? मराठी भाषेच्या संवर्धनासाठी सर्वप्रथम तिच्याविषयी आपल्या मनात प्रेम निर्माण होणे अत्यंत गरजेचे आहे. आणि प्रेम तेव्हाच निर्माण होईल जेव्हा दैनंदिन व्यवहारात आपण तिचा अधिकाधिक वापर करू. वापर करणे म्हणजे केवळ मराठी बोलणे नव्हे, तर दैनंदिन व्यवहारात परकीय शब्द टाळून शुद्ध मराठी बोलणे. काही वस्तूंची निर्मितीच गेल्या काही वर्षांत झाली असल्याने त्यांना पर्यायी मराठी शब्द सध्यातरी नाहीत, असे शब्द वगळता ज्या ज्या शब्दांना पर्यायी मराठी शब्द आहेत, त्यांचा वापर तर आवर्जून केला पाहिजे. यासाठी घरी वाहिन्यांवर सासू सुनांच्या मालिका पाहण्याऐवजी मराठीतील पौराणिक आणि ऐतिहासिक मालिका पाहाव्यात. प्राचीन ग्रंथांचे आणि पुस्तकांचे वाचन करावे. इतरांशी बोलताना मग समोरचा कोणत्याही भाषेचा का असेना आपल्या बोलण्याची सुरुवात मराठीतच व्हायला हवी. आपल्या पाल्यांना स्वभाषेचे संस्कार घरातून नियमितपणे दिले गेले पाहिजेत. पाल्यांशी घरामध्ये शुद्ध मराठी भाषेतच संवाद साधायला हवा. त्यासाठी मुलांना सर्वप्रथम मम्मी-डॅडी' ऐवजी आई-बाबा बोलायला लावा. भ्रमणध्वनीवर बोलताना 'हॅल्लो' ऐवजी 'नमस्कार' बोलण्याची सवय स्वतःला लावून घ्या. 'गुड मॉर्निंग-गुड नाईट' ऐवजी सुप्रभात-शुभरात्री बोलण्याची सवय लावा. आपले सण पारंपारिक पद्धतीने साजरे करून मित्र मंडळींना, आप्तेष्टांना सणांच्या शुभेच्छा मराठीतून द्या, मुलांना इंग्रजीतील काल्पनिक पात्रे आणि कार्टून दाखवण्याऐवजी मातृभूमीत होऊन गेलेले पराक्रमी राजे-महाराजे, अवतार, क्रांतिकारक, संत यांच्या गोष्टी सांगा. आपली स्वाक्षरी मराठीतून करा. दारावरील पाटी मराठीतून लावा. व्यक्तीचे नाव लिहिताना नावाआधी श्री., सौ., श्रीमती. कु. ही आरंभाक्षरे लिहिण्याची सवय लावा. आपल्या भाषेचे आपल्यावर अनंत उपकार आहेत. ते फेडायचे असतील तर तिचे संवर्धन करणे आणि तिचा दैनंदिन व्यवहारात अधिकाधिक वापर करणे काळाची गरज आहे.

**जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**
**संपर्क क्रमांक : ९६६४५५९७८०**

# माझं ते खरे म्हणू नका !

काही लोकांकडे पाहिलं की लक्षात येते, की हे लोक आपल्याच कंपू मध्ये वावरात असतात. ज्याप्रमाणे बेडकाला त्याचं डबकं म्हणजेच सारं विश्व वाटत असतं, त्याप्रमाणे हे लोक इतर जगापासून अलिप्त राहून नव्या कल्पना, नवीन विचार,सत्य आणि वस्तुस्थिती यापासून अलिप्त राहत असतात. माझं म्हणणंच खर आहे,अंतिम सत्य आहे, वस्तुस्थिती आहे असं त्यांचं म्हणणं असतं. मग अशा लोकांना,'माझं ते खरं म्हणू नका,खरं ते माझं म्हणा!' असं सांगावं वाटतं. पण ते ऐकतील तेव्हा खरं.

एखादा व्यक्ती एखाद्या कार्यालयात चपराशाची नोकरी करत असतो. दिवसभर तो कार्यालयातील साहेबांच्या फायली उचलतो, झाडलोट करतो आणि इतर सारी कामं करत असतो. तोच चपराशी जेव्हा आपल्या घरी येतो तेव्हा मात्र तो साहेब बनतो. आल्या आल्या तो खुर्चीवर बसतो आणि आपल्या बायकोला हुकूम देतो. मुलांना कामाला लावतो. हात,पाय,तोंड धुतल्यानंतर स्वतःच्या हाताने टॉवेल सुद्धा घेत नाही. माझा शब्द म्हणजे प्रमाण आहे! असं साऱ्यांनी समजावं असं तो सर्वांना म्हणतो . तो आपल्या घरात हुकूमत गाजवतो. पुरुषसत्ताक व्यवस्थेचा तो खऱ्या अर्थाने प्रतिनिधीच असतो. माझं तेच खरं! हा त्याचा घरातील वर्चस्ववादी वृत्तीचा तोटा कुटुंबातील सर्वांना सहन करावा लागतो. अशी हेकेखोर लोक आपल्या आजूबाजूला मोठ्या प्रमाणात दिसतात... अशा लोकांना कशा पद्धतीने सामोर जावं? हे कधीकधी शहाण्या माणसांना देखील समजत नाही.

अशा लोकांची प्रत्येक गोष्टीसाठी स्वतःची अशी एक समजूत असते. या समजुतीतून या लोकांमध्ये एक अहंकार निर्माण झालेला असतो. मी सांगितलेलंच खर आहे! अशी कठोर भूमिका घेऊन ते वावरत असतात. नव्या कल्पना, नवे विचार ते स्वीकारण्यास तयार होत नाहीत. खूप वेळा हे लोक जाणून बुजून आपल्याच भूमिकेवर ठाम राहतात. त्यांच्या बोलण्या वागण्यात लवचिकता नसते. सतत हेकेखोरपणा करणाऱ्या या लोकांना सारे जण टाळत असतात. काही वेळा व्यवहारात सुसंगत होईल अशा बाबी या लोकांना सांगितल्यास त्यांना ती पटत नाही. धार्मिक, राजकीय अथवा इतर प्रकारचा कट्टरवाद हा अशा लोकांमुळेच समाजात वाढत आहे.स्वतःच्या बुद्धीला, भावनेला आणि मताला कुलूप लावून,चावी हरवून बसलेले हे लोक समाजाची घडी विस्कटवण्याचेच काम करत आहेत.

असं म्हणतात समाजात, गेल्यानंतर स्वतःच्या तोंडावर नियंत्रण ठेवावं आणि जास्त ऐकून घ्यावं ; तर एकांतात बसल्यानंतर मनात निर्माण होणाऱ्या विचारांवर नियंत्रण ठेवावं आणि स्वतःच्या अंतरात्म्याचा आवाज ऐकावा. जास्त बोलणे, उपदेश करणे, टाळून मोजकेच बोलणे परिणामकारक होत असते. बाष्कळ बडबड करून स्वतःला हिरो बनवून घेण्याची हौस सोडून देऊन, अभ्यासपूर्ण आणि विचार पूर्वक बोलण्याचा प्रयत्न केला पाहिजे. माझंच ऐकून घ्या! मला प्रतिवाद करू नका! मी म्हणतो तेच खरं आहे! ही हुकूमशाही वृत्ती समाजात वाढत आहे. मी सांगतो तसंच लोकांनी वागलं पाहिजे. आचरण केलं पाहिजे. आहार, विहार आणि विचार ही प्रत्येकाची स्वतःची वैयक्तिक बाब असते. त्याबाबत त्या व्यक्तीला पूर्ण स्वातंत्र्य असतं. परंपरा, संस्कृती आणि सामाजिक परिसर यातून प्रत्येक व्यक्ती घडलेला असतो. त्यातून त्याची विचार पद्धती तयार झालेली असते. दुसऱ्याला वैचारिक गुलाम बनवण्याचा प्रयत्न कोणीच केला नाही पाहिजे. प्रत्येकाने ज्येष्ठ, अनुभवी, अध्यात्मिक, शास्त्रीय आणि सामाजिक विचारवंतांच्या विचारांची कास धरून स्वतःच्या विवेक बुद्धीला स्मरून वैचारिक बैठक तयार केली पाहिजे.

एकदा गौतम बुद्धांना एक व्यक्ती भेटण्यास आला.त्याने गौतम बुद्धांना प्रश्न विचारला – ' देव आहे की नाही?' यावर गौतम बुद्ध त्याला काहीही बोलले नाहीत. शेजारी गौतम बुद्धांचा शिष्य बसला होता. पुन्हा एकदा त्या व्यक्तीने गौतम बुद्धांना देव आहे की नाही? हा प्रश्न विचारला. गौतम बुद्धाने त्याला कोणतेच उत्तर दिले नाही. तो व्यक्ती नाराज होऊन निघून गेला. शेजारी बसलेल्या शिष्याने गौतम बुद्धांना विचारले की,' तुम्ही त्या व्यक्तीच्या प्रश्नाचे उत्तर का दिले नाही? ' यावर गौतम बुद्ध म्हणाले – ' मी जर त्याला देव आहे असं म्हटलं असतं, तर मी आस्तिक आहे असं त्याला वाटलं असतं. मी जर त्याला देव नाही असं उत्तर दिलं असतं, तर मी नास्तिक आहे असं त्यानं समजलं असतं. देव आहे की नाही याचे उत्तर स्वतः आपल्या विवेक बुद्धीला प्रत्येकाने विचारून ठरवलं पाहिजे!' यावर शिष्याला धडा मिळाला की, आपल्या स्वतःचे विचार इतरांवर न लादता,चिकित्सा करून निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य प्रत्येकाला दिलं पाहिजे! माझं ते खरं न म्हणता खरं ते माझं म्हणण्याची वृत्ती आपण जपली पाहिजे.

**- किशोर जाधव,सोलापूर**
**- मो. नं. ९९२२८८२५४१**

## महा पर्वणी..

साहित्य सम्मेलन
खास महा पर्वणी
बहु साहित्यप्रकार
अव्याहत झरवणी

कटूऔषधांसोबत
अमृताची पुरवणी
साहित्यिक रसिक
ग्रंथ संगम त्रिवेणी

पाहून साहित्यिका
झरार वाहे लेखणी
रसिकासमोरसादर
कला कृती देखणी

संयोजकांनीपरिक्षा
समृध्द हो आखणी
पुस्तकांची शिबीरे
रत्नाचीबावन्नखणी

अहोरात्रप्रयास राबे
काही राहू नये उणी
गालबोट लागे चुकी
ह्रदयसलेल टोचणी

उद्रेकरोध अनाठाई
आधी घेती चाचणी
मुक्त मोहक सोहळा
ना सत्ताधारीदावणी

आकर्षक बहु विध
कार्यक्रमाचीबांधणी
दिग्गजा सहीत हवी
नवोदितांची नोंदणी

संपन्नहोता महोत्सव
जागेसुरेखआठवणी
हे सुबक सह मिलन
मनामनात साठवणी

**- हेमंत मुसरीफ पुणे**
**९७३०३०६९९६**

# विश्वबंधुत्व-विश्वशांतीचे दूत : निरंकारी बाबा

आजच्या विश्वविख्यात आध्यात्मिक संत निरंकारी मिशनने जगाच्या पाठीवर सकारात्मक छाप उमटवली आहे. खरे तर याचे श्रेय जाते ते तत्कालीन युगदृष्टा सद्गुरु निरंकारी बाबा हरदेवसिंहजी महाराज यांना. त्यांनी अखिल मानव जातीत प्रेम भावनेने मानव एकता वाढीस लावली. म्हणून मिशनद्वारे त्यांचा जन्मदिवस गुरुपूजा दिवस निरंकारी जगतात अधिक उत्साहाने विविध लोककल्याणकारी उपक्रमांनी साजरा होऊ लागला. सद्गुरुची महती सांगताना जगद्‌गुरु तुकारामजी महाराजांनी म्हटले–

**सद्गुरु वाचोनि सापडेना सोय।**
**धरावे ते पाय आधी आधी।**

संतशिरोमणी हरदेवसिंहजी महाराजांचा जन्म दिल्ली येथे दि.२३ फेब्रुवारी १९५४ रोजी झाला. त्यांचे वडील बाबा गुरबचनसिंहजी महाराज हे निरंकारी मिशनचे तत्कालीन सद्गुरु होते. बालपणी छोट्या हरदेवांना सर्व आप्तस्वकीय आणि संतमंडळी भोला नावाने प्रेमाने हाक मारत असत. विश्वात मानव एकता प्रस्थापनेच्या प्रसार कार्यात तत्कालीन सद्गुरु बाबा गुरबचनसिंहजी महाराज हे व्यस्त असतानाच जगतकल्याणार्थ शहीद झाले. त्यानंतर इ.स.१९८० पासून बाबा हरदेवसिंहजी महाराज हे पोरक्या झालेल्या साधसंगतचे- निरंकारी भक्तमंडळींचे सद्गुरु झाले. मिशनचे प्रसार- प्रचार कार्ये अधिक जोमाने सुरू केले. आपले सर्वस्व पणाला लावून बाबाजींनी जगातील कानाकोपर्यात सत्यसंदेश पोहोचवण्यासाठी दिवसरात्र एक करून मिशनचे रथ उत्साहात दामटले. तेव्हापासून मिशनद्वारे २३ फेब्रुवारी हा गुरुपूजा दिवस विविध जनहिताच्या उपक्रम- अभियानांच्या रुपात साजरा करण्यात येऊ लागला. त्यामुळे मिशनच्या कार्यांचा सुगंध सर्वत्र दरवळू लागला. गुरुपूजेच्या परंपरागत पूजाविधीचा सामान गोळा करून गुरूपाद्यपूजा करण्याच्या प्रथेस फाटा देण्यात आला. नवनवीन उपक्रम तथा अभियान हाती घेतले गेले. त्यात प्रामुख्याने रक्तदान, रक्तगट तपासणे, नेत्रदान, अवयवदान, मदत व पुनर्वसन आदी परिस्थितीनुरुप अभियान समाविष्ट केले गेले. यादिवशी शिष्यांनी पूजापाठ मांडून गुरुप्रतिमेसमोर वा गुरुचरणांवर हात जोडून मस्तक टेकवले पाहिजेच असे नाही. तर गुरुदेवाची शिकवण, गुरुवचन आणि मिळालेला गुरुआदेश हे शिरसावंद्य मानून तन, मन, धनाने त्यासाठी स्वतःला झोकून देणे, हीच श्रेष्ठ गुरुपूजा ठरते. आज हेच सत्य समोर आले आहे, कारण तीच काळाची नितांत गरज आहे. बाबा हरदेवसिंहजी महाराजांनी सत्यवचन प्रस्तुत केले–

**गुरू वचन का पालन करना ही जीवन शृंगार हैं।**
**सद्गुणों को धारण करना ही जीवन शृंगार हैं।**
**सच से जुड़कर सन्तमति को जो जन भी अपनाता हैं।**
**कहे 'हरदेव' जहाँ भी जाता वह जन शोभा पाता हैं।**
**पवित्र सम्पूर्ण हरदेव बाणी: पद क्र.१८८**

शांतीपूर्ण सह-अस्तित्वाची भावना जागृत करून जगामध्ये विश्वमानव-एकता, विश्वबंधुत्व आणि विश्वशांती अशा एकत्वाने युक्त वातावरण निर्माण करण्यात आपले संपूर्ण जीवन निरंकारी बाबा हरदेवसिंहजी महाराजांनी समर्पित केले. दरवर्षी त्यांच्या जन्मदिनी संत निरंकारी मिशनतर्फे विश्वभरातील मिशनच्या लाखो शाखांमध्ये लाखो वृक्ष लावून त्यांचे कमीत कमी तीन वर्षांपर्यंत संरक्षण- संवर्धन करण्याचा प्रण करण्यात येत असतो. भवननिर्माण कार्यात सेवा केली जाते. सेवादार बंधुभगिनी आपत्कालात मदतकार्यात स्वतःला झोकून देतात. हीच निरंकारी संतमंडळींची गुरुपूजा होय. यातून सांप्रत सद्गुरु माऊलीच्या शिकवणीचे तंतोतंत पालन होते. त्यामुळे सद्गुरु माऊली प्रसन्न होते, असा त्यांचा दृढविश्वास आहे. दरवर्षी बाबाजींच्या जयंतीनिमित्त जगभर राबविण्यात येत असलेल्या वृक्षारोपण, वृक्षसंरक्षण व वृक्षसंवर्धन अभियानांतर्गत २१ ते २३ फेब्रुवारी दरम्यान प्रत्येक निरंकारी परिवारातील सदस्याने कमीत कमी एक रोप लावून त्याचे तीन वर्षांपर्यंत संगोपन व संरक्षण करावे. यंदाही अशी प्रेरणा वर्तमान सद्गुरु माता सुदीक्षाजी महाराजांनी दिली आहे. इ.स.२००३पासून याच गुरुपूजा दिवसाच्या पावन पर्वावर स्वच्छता अभियानाचीही मोठ्या उत्साहाने सुरुवात झालेली आहे. हे देशव्यापी अभियान तेव्हापासून निरंतर आयोजित करण्यात येत आहेत. कारण हाच मानवाचा धर्म आहे. संत एच.एस. निर्माणजी आंग्लभाषेत म्हणातात–

**लव्ह इज दि रिलिजन; हॅट्रेड प्रोफेनिटी.**
**लव्ह इज नॉर्मेलिटी; हॅट्रेड एन्सेनिटी.**
**लव्ह इज इस्लेम अँड लव्ह इज ख्रिश्चेनिटी.**
**गॉड इज दि लव्ह लिव्ह्ज इन हुमेनिटी.**
**थिंक इट ओव्हर....**

वर्तमान निरंकारी सद्गुरू माता सुदीक्षाजी महाराज आज बाबाजींचे तेच दिव्य संदेश जगाच्या कानाकोपऱ्यात पोहोचवत आहेत. त्यात हीच प्रेरणा देत आहेत, की आपला जीवन तेव्हाच सार्थक होईल; जेव्हा आपण दुसऱ्यांच्या कामी येऊ. संत निरंकारी मिशन अनेक वर्षांपासून संत निरंकारी चॅरिटेबल फाऊंडेशनच्या माध्यमातून समाज कल्याणाच्या कार्यामध्ये कार्यरत आहे. मिशनच्या माध्यमातून रक्तदान शिबिर, स्वच्छता अभियान, वृक्षारोपण अभियान यांसारखे अनेक सामाजिक उपक्रम राबविण्यात येत असतात. मागील सन २०२१ व यंदाचे हे वृक्षारोपण अभियान राबवित असताना कोरोनाविषयीचे शासकीय मार्गदर्शक सूचनांचे पालन अवश्यच करण्यात आले आहे. ग्रंथकार अवतारसिंहजी महाराज मानवाला एकत्र येण्यास बजावतात–

**मेरे सजनों रल मिल आओ रब दी महिमा गा लईए।**
**सत्गुर तों रब कर के चेते इस ते ध्यान जमा लईए।**
**अवतार गुरु दी चरनीं ढह के अठसठ तीरथ नहा लईए।**
**जिस लई मिलया एह तन चोला ओहो कम्म मुका लईए।**

(पवित्र सम्पूर्ण अवतार बाणी: पद क्र.७५)

संत निरंकारी मिशनचे आजवरचे आधारवड, दीपस्तंभ तथा बुलंद मजबुती प्रदान करत आलेले सद्गुरु- बाबा बुटासिंहजी महाराज, शहंशाह बाबा अवतारसिंहजी महाराज, युगप्रवर्तक बाबा गुरबचनसिंहजी महाराज, युगदृष्टा बाबा हरदेवसिंहजी महाराज, माता सविंदरजी महाराज आणि वर्तमान सद्गुरु माता सुदीक्षाजी महाराज हे आहेत. गुरुपूजा दिवसाच्या पावन पर्वावर त्यांच्या चरणारविंदावर दासाचे कोटी कोटी प्रणाम! अखिल विश्वाच्या कल्याणाची तळमळ उराशी बाळगून निरंकारी बाबा संतश्रेष्ठ हरदेवसिंहजी महाराज वर्षभर देश-विदेशांची दिव्ययात्रा करीत होते. आज प्रादेशिक, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय निरंकारी संत समागमातूनही असे अभियान चालविले जाऊ लागले. ही माझ्या निरंकारी बाबाजींची पुण्याई होय. अशाच विदेशी मानवकल्याण यात्रेदरम्यान कॅनडा येथे रस्ता अपघाताचे निमित्त घडून बाबाजींनी नश्वर देहाचा त्याग केला. निरंकारी बाबा युगदृष्टा सद्गुरु हरदेवसिंहजी महाराज दि.१३ मे २०१६ रोजी ब्रह्मलीन झाले. ही बातमी ऐकून संपूर्ण विश्वावर शोककळा पसरली होती, हे येथे उल्लेखनीय!

**!! साधसंगतजी, चरणस्पर्श धन निरंकारजीं! निरंकारी गुरुपूजा दिवसाच्या सर्व बंधुभगिनींना हार्दिक शुभेच्छा !! – चरणधूळ –**
**श्रीकृष्णदास (बापू) निरंकारी.**
**(मराठी साहित्यिक, नागपूर विदर्भ प्रदेश)**
**मु. रामनगर, गडचिरोली. ७७७५०४१०८६.**

This letter was written by owner, printer, publisher - Vinod Kailas Gore by Siddhakala Print Media And Publications Pvt. Ltd. at Main Road, At. Plot No. W-230, T.T.C. Industrial Area, Khairne MIDC, Thane Belapur Road, Navi Mumbai, Dist- Thane, Pin Code- 400710, Maharashtra and Published at C/o. Prashant Arun Chavan, House No. 926/3, Flat No. 301, Sector 1A, Nerul, Navi Mumbai, Thane Maharashtra – 400 706 Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Thane Court.
Email : newsaksharaj2021@gmail.com Editor : Prashant Arun Chavan (Editorial responsibility will remain with PRB as per law.) Mob : 8605313202
हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक विनोद कैलास गोरे - यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँड पब्लिकेशन्स प्रा.लि.,प्लॉट नं. डब्लू- २३०, टी.टी.सी. इंडस्ट्रियल एरीया, खैरणे एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, नवी मुंबई, जि. ठाणे, पिन कोड - ४०० ७१०, महाराष्ट्र येथे मुद्रित करून, प्रशांत अरुण चव्हाण, हाऊस नं.९२६/३, फ्लॅट ३०१, सेक्टर १अ, नेरुळ, नवी मुंबई, जि.ठाणे, महाराष्ट्र - ४०० ७०६ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे. या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद ठाणे न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail. com संपादक : प्रशांत अरुण चव्हाण (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्याकडे राहील.) मोबा.: ८६०५३१३२०२

## थोडक्यात बातम्या

### संत गाडगेबाबा महाराज यांना जिल्हा परिषदेत अभिवादन



**दि.२३, ठाणे :** थोर समाजसुधारक संत गाडगेबाबा महाराज यांच्या जयंतीनिमित्त आज, जिल्हा परिषद ठाणे, आरोग्य विभाग अंतर्गत अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.दिनेश सुतार यांच्या हस्ते प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी जिल्हा विस्तार व माध्यम अधिकारी संजय जाधव, आरोग्य पर्यवेक्षक विक्रांत कांबळे, आरोग्य सहाय्यक अनिरुद्ध लोध, शिल्पा नाईक आदी उपस्थित होते.

### निरीक्षक वैधमापनशास्त्र, ठाणे-१, ठाणे-२, ठाणे-3 व भाईंदर विभाग ही कार्यालये स्थलांतरीत

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.२२, ठाणे :** उपनियंत्रक, वैधमापन शास्त्र, ठाणे जिल्हा क्र.१, ठाणे या कार्यालयाच्या अधिनस्त कार्यरत असलेले निरीक्षक वैध मापनशास्त्र, ठाणे-१, ठाणे-२, ठाणे-३ व भाईंदर विभाग ही कार्यालये खाजगी जागेत भाडेतत्वावर तृणपुष्प सोसायटी, पाईप लाईन रोड, लुईसवाडी, ठाणे (प) ४००६०४ या जागेत कार्यरत होते.

हे कार्यालय दि.१८ फेब्रुवारी २०२५ पासून नवीन जागेत स्थालांतरित करण्यात आले असून या कार्यालयांचा नवीन पत्ता निरीक्षक वैध मापनशास्त्र ठाणे-१, ठाणे-२, ठाणे-३ व भाईंदर विभाग ठाणे महानगरपालिकेच्या परिवहन सेवा, येथील प्रशासकीय भवन पहिला मजला, रोड नं. २७ आणि ३४, वागळे आगार, वागळे इस्टेट, ठाणे (प) -४००६०४ असा असल्याचे ठाणे जिल्हा क्र.१, ठाणे वैधमापन शास्त्र उपनियंत्रक रा.फ. राठोड यांनी कळविले आहे.

### डॉ.विजय सूर्यवंशी यांनी कोकण विभागीय आयुक्त पदाचा स्विकारला पदभार

**अक्षराज : जे. के. पोळ**




**दि.२३, नवी मुंबई :** कोकण विभागीय आयुक्त पदाचा डॉ. विजय सूर्यवंशी यांनी पदभार स्विकारला असून आज सर्व विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची आढावा बैठक घेऊन कोकण विभागातील कामकाजाचा आढावा घेतला.

डॉ. विजय सूर्यवंशी यांची बदली कोकण विभागीय आयुक्त पदावर झाली आहे. यापूर्वी ते राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या आयुक्त पदावर कार्यरत होते. डॉ. विजय सूर्यवंशी यांनी नुकताच कोकण विभागाचा पदभार स्विकारला असून, डॉ. सुर्यवंशी हे सन २००६ च्या भारतीय प्रशासकीय सेवेतील अधिकारी आहेत. त्यांचे शालेय शिक्षण सातारा सैनिक शाळा तसेच नाशिक जिल्ह्यातील देवळा येथील जिल्हा परिषदेच्या शाळेत पूर्ण झाले आहे. पुढे पी.एच.डी. (व्यवस्थापन), एम.बी.ए. (मार्केटिंग), एल.एल.बी., बी.एस.सी. (फिजिक्स) असे उच्च शिक्षण पूर्ण करुन त्यांनी दि.०९ मार्च २०१२ रोजी महाराष्ट्र औद्योगिक विकास मंडळ, मुंबई येथे सह मुख्यकार्यकारी अधिकारी या पदावर रुजू होवून प्रशासकीय सेवेत प्रवेश केला. दि.११ जुलै २०१३ ते आता पर्यंत मुख्यकार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, कोल्हापूर, मुख्यकार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पालघर, जिल्हाधिकारी गोंदिया, जिल्हाधिकारी रायगड, कल्याण डोंबिवली महानगर पालिका आयुक्त, अतिरिक्त आयुक्त मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकारण, मुंबई, महाराष्ट्र राज्य उत्पादन शुल्क आयुक्त, मुंबई अशा विविध महत्वाच्या पदावर उल्लेखनीय काम केले आहे. आयुक्त डॉ. विजय सुर्यवंशी यांच्या उल्लेखनीय कामाबद्दल त्यांना विविध पुरस्कारांनी गौरविण्यात आले आहे.

### ग्रामपंचायत संगणक परिचालक ५ महिन्यापासून मानधनाविना वंचित...

**अक्षराज : दत्ता हमंद**

**दि.२३, नांदेड :** संपूर्ण महाराष्ट्रात ग्रामपंचायत स्तरावर काम करण्याऱ्या गावातील नागरिकांच्या दस्ताऐवजाबाबत महत्त्वाची कामे करणाऱ्या संगणक परिचालकांना मागील ५ महिन्यांपासून मानधनचं मिळाले नसल्याची गंभीर बाब समोर येत आहे. त्यामुळे संगणक परिचालकांवर उपासमारीची वेळ आली आहे. आर्थिक परिस्थितीला सामोरे जावे लागत आहे. तात्काळ मानधन देण्याची मागणी संगणक परिचालकांकडून होत आहे.

राज्यातील सुमारे २९हजार ग्रामपंचायतमध्ये २०हजार संगणक परिचालक राज्यातील ७ कोटी ग्रामीण जनतेला विविध प्रकारच्या ऑनलाईन व ऑफलाईन सेवा देण्याचं काम करत असून या सेवा शेतकरी कर्जमाफी योजना, ग्रामीण घरकुल योजनेचा सर्वे, पी एम किसान योजना, कोरोना काळातील कोरोना योद्धा म्हणून केलेली कार्ये, याशिवाय सध्या सुरु असलेली शासनाची महत्वकांक्षी मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना, विविध प्रकारचे दाखले देणे,पत्रव्यवहार करणे, प्रस्ताव तयार करणे, माझी वसुंधरा अभियान राबवणे, आयुष्यमान कार्ड, शेतकरी आयडी इत्यादी अनेक प्रकारचे कामे संगणक परिचालक करत आहेत. गेल्या अनेक वर्षापासून कर्मचारी कार्यरत असून मात्र प्रशासनाचे दुर्लक्ष असल्याचे कर्मचारी सांगत आहेत. ज्यांच्या जिवावर डिजिटल महाराष्ट्र म्हणून घोषित केला जातो तो संगणक परिचालक गेल्या ५ महिन्यांपासून मानधनाविना उपाशी आहे. प्रत्येक महिन्याच्या सुरुवातीला नियमित मानधन देण्याची मागणी होत आहे. ग्रामपंचायतींमध्ये गत १५ वर्षांपासून ऑनलाईन कामे करण्यासाठी संगणक परिचालक रात्रभर जागी राहून आराखडा अपलोड करत असतो. ग्रामपंचायतीचा वार्षिक आराखडा नुकताच तयार करण्यात आला होता. सर्व्हर चालत नसल्यामुळे दिवसा आराखडा अपलोड होत नव्हता. आराखडा मुदतीमध्ये अपलोड झालाच पाहिजे असे आदेश वरिष्ठांचे होते. त्यामुळे संगणक परिचालकांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागले. अखेर शेवटचा पर्याय म्हणून संगणक परिचालकांनी रात्रभर जागून आराखडा अपलोड केला. संगणक परिचालकांना मासिक १० हजार रुपये मानधन दिले जाते. या तुटपुंज्या मानधनावर ऑपरेटर कुटुंबीयांचा उदरनिर्वाह करणे अवघड झाले आहे. अनेकांवर उपासमारीची वेळ आली आहे. वारंवार मागणी करून सुद्धा मानधन देण्यास जाणीवपूर्वक टाळाटाळ केली जात आहे.

# ठाण्यातील मराठमोळा वडापाव पोहचला सातासमुद्रापार....

**अक्षराज : संजय पंडित**

**दि.२३, ठाणे :** गोरगरिबांपासून ते श्रीमंतांपर्यंत सर्वांच्याच आवडीचा पदार्थ असलेल्या अस्सल मराठमोळ्या वडापावची आता साऱ्या जगाला भुरळ पडली आहे. वडापाव साठी मुबईची तर ख्याती आहेच, पण त्यापाठोपाठ ठाण्यातील वडापाव देखील आता सातासमुद्रापार पोहचला आहे.

महाराष्ट्रातील प्रसिद्ध वडापाव आजमितीला अनेकांचं पोट भरतो आहे.काहींचा तर सकाळचा नाश्ता ते रात्रीचं जेवण हा 'वडापाव'च असतो. त्यातही मुंबई आणि मुंबईचा वडापाव यांचं नातं खास आहे. मुंबईत आल्यावर वडापाव ट्राय नाही केला असं होतच नाही.

बटाट्याची भाजी अन् बेसन पिठापासून तयार केलेल्या या वडापावची जागा आता वेगवेगळ्या चवीच्या आणि फ्लेवरच्या वडापावनं देखील घेतलीय. चीज वडापाव, तंदुरी वडापाव, मंच्युरियन वडापाव, ग्रील वडापाव, जम्बो वडापाव असे अनेक वडापावचे प्रकार खवय्यांमध्ये लोकप्रिय ठरत आहेत. अशाच या मराठमोळ्या वडापावची भुरळ आता सातासमुद्रापार असलेल्या नागरिकांनाही पडल्याचं बघायला मिळतंय.१९६६ मधे दादरच्या अशोक वैद्य यांनी दादर स्टेशनपासून सुरू केलेल्या वडापावनं आता जागतिक पातळीवर आपलं विशेष स्थान निर्माण केलंय. जगभरातील एकूण २० नाष्ट्यामध्ये आता आपल्या मराठमोळ्या वाडापावणे स्वतःचे स्थान निर्माण केले आहे. दादरच्या मामा काने आणि संगमनेर जवळील चाचाचा



वडापाव तर सगळ्यांच्या कुतूहलाचा विषय बनून दिवसेंदिवस वडापावची ख्याती वाढवित आहे.

अशाच प्रकारे ठाण्यातील पाचपाखाडी येथील गेल्या ३० वर्षांपासून या व्यवसायात यशस्वी ठरलेल्या म्हात्रे यांच्या कुटुंबीयांशी बातचीत केली असता, त्यांच्या वडापावची मागणी अमेरिका, जपान, दुबई, ऑस्ट्रेलिया, लंडन अशा दूरदेशा पसरलेल्या महाराष्ट्रीयन लोकांच्याकडून असल्याची माहिती त्यांनी दिली.

दरम्यान या वडापावच्या प्रक्रिये बद्दल बोलताना म्हात्रे म्हणाले की, विविध देशातील नागरिकांना वडापाव देण्यापूर्वी तो वडापाव गरमा-गरम तयार करुन त्याला थंड केलं जातं. त्यानंतर फॉईल पेपरमध्ये रॅप करुन तो वडापाव पार्सल करुन दिला जातो. घरी गेल्यानंतरही रॅपमधून बांधून नेलेले वडे तसेच ताजे राहतात. त्यामुळं रॅपमधून काढून तो वडापाव गरमा गरम खाऊ शकतो. ठाण्याहून निघताना वडापावची असलेली चव २४ तासानंतरही जशीच्या तशीच असते, चटणी आणि पॅकिंग बाबत सांगताना ते म्हणाले की, वडापाव व्यवसायात वड्यासोबत तुम्ही ग्राहकांना काय विशेष देता हे महत्त्वाचं आहे. त्यामुळं आम्ही तीन वेगवेगळ्या चटणी आणि दूर जाणाऱ्या पार्सलचे विशेष पॅकिंग करतो आणि हेच ग्राहकांच्या आकर्षणाचं केंद्र असल्याच त्यांनी सांगितलं.

# बांधकाम व्यावसायिक, वास्तुविशारद, उद्योजक यांच्याशी नमुंमपा आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांचा सुसंवाद

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.२२, नवी मुंबई :** महानगरपालिका क्षेत्रातील उद्योग व व्यवसायास चालना देण्यासाठी उद्योजक व व्यावसायिक यांच्या अडचणी जाणून घेण्याच्या दृष्टीने महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या वतीने महापालिका मुख्यालयात विशेष बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये आयुक्तांनी उपस्थित उद्योजक व व्यावसायिक यांच्याशी संवाद साधत त्यांना प्रशासकीय पातळीवर जाणवणाऱ्या अडचणी जाणून घेतल्या व त्यामधील तातडीने करावयाच्या बाबींवर पूर्तता करण्याचे निर्देश संबंधित विभागांना दिले. याप्रसंगी महापालिकेचे शहर अभियंता शिरीष आरदवाड, सहा. संचालक नगररचना सोमनाथ केकाण उपस्थित होते.

या बैठकीमध्ये एमआयडीसी, एपीएमसी मार्केट यांचे उच्च अधिकारी तसेच ठाणे बेलापूर इंडस्ट्रीज असो., स्मॉल स्केल इंड. असो., क्रेडाई एमसीएचआय नवी मुंबई बिल्डर्स असो., इंडियन इन्स्टिट्युट ऑफ आर्किटेक्ट असो., केमिस्ट अँड



ड्रगिस्ट असो., होलसेलर्स असो., नवी मुंबई व्यापारी असो. यांचे पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी सर्व संस्था प्रतिनिधींनी मनोगतातून व्यक्त केलेल्या अडी-अडचणी, सूचना आयुक्तांनी जाणून घेतल्या व त्यावर आवश्यक त्या उपाययोजना करण्याचे निर्देश संबंधित महापालिका विभागांना दिले. महापालिका क्षेत्रात उद्योग, व्यवसाय करणाऱ्या घटकांमुळे शहराचे महत्व वाढते असे स्पष्ट करीत या घटकांशी नियमित संवाद रहावा यादृष्टीने अशा प्रकारच्या बैठका यापुढील काळात नियमित आयोजन करण्यात येतील असे आयुक्तांनी सांगितले.

उद्योग, बांधकामे व व्यवसायासाठी लागणाऱ्या विविध परवानग्या, प्रमाणपत्रे जलद व सहजपणे उपलब्ध होण्याच्या दृष्टीने ऑनलाईन कार्यपद्धतीचा अंगिकार करून कार्यप्रणालीत सुधारणा व गतीमानता आणण्याच्या दृष्टीने एक खिडकी संकल्पनेनुसार कार्यवाही सुरू असल्याचे आयुक्तांनी यावेळी सांगितले. पुनर्विकासांतर्गत होणाऱ्या बांधकामांमुळे शहराची लोकसंख्येत आगामी काळात पडणारी लक्षणीय भर लक्षात घेता शहराला भविष्यात असलेली पाण्याची गरज लक्षात घेऊन बांधकामे करताना महानगरपालिकेच्या अत्याधुनिक मलप्रक्रिया केंद्रांतील शुध्दीकरण केलेल्या पुनर्प्रक्रियाकृत पाण्याचा वापर बांधकामासाठी व पिण्याव्यतिरिक्त इतर बाबींसाठी करावा व पिण्याच्या पाण्याची बचत करावी असे आयुक्तांनी पुन्हा एकवार सर्वांना सांगितले. काही गोष्टी सामाजिक जबाबदारी म्हणून करणे गरजेचे असते याची आयुक्तांनी जाणीव करून दिली. मुख्यमंत्री महोदय यांच्या संकल्पनेतील क्षेत्रीय शासकीय व निमशासकीय कार्यालयांसाठी १०० दिवसांच्या कृती आराखड्यामधील सात कलमांमध्ये गुंतवणूकीस प्रोत्साहन हे देखील एक महत्वाचे कलम असून त्याची प्रभावी अंमलबजावणी करताना ही बेठक महत्वाची होती.

स्वच्छ सर्वेक्षणातील महत्वाचा भाग असलेल्या नागरिकांचा प्रतिसाद अर्थात सिटीझन फिडबॅक नोंदविण्यास स्वच्छ भारत मिशनमार्फत सुरूवात झाली असून https://sbmurban.org/feedback या लिंकवर क्लिक करून नागरिक शहर स्वच्छतेविषयीचा आपला अभिप्राय अॅपवर नोंदवू शकतात.

त्यानुसार प्रत्येक नवी मुंबईकर नागरिकाने आपल्या मोबाईलवरून शहराच्या सर्वोत्तम मानांकनासाठी सर्वेक्षणात विचारल्या जाणाऱ्या १० प्रश्नांची सर्वोत्तम उत्तरे देऊन आपल्या नवी मुंबई शहराचे मानांकन उंचवावे असे आवाहन करण्यात आले आहे. याविषयी बैठकीत माहिती देण्यात आली व अभिप्राय नोंदवून प्रात्यक्षिक करण्यात आले. अशाप्रकारे प्रत्येकाने आपले कुटुंबिय, मित्र - परिवार, कार्यालयीन सहकारी यांनाही अभिप्राय नोंदविण्यास प्रोत्साहीत करावे असे यावेळी सूचित करण्यात आले.

अशाप्रकारे आयुक्तांनी विशेष बैठक आयोजित करून समस्या जाणून घेतल्या व त्याच्या निराकरणासाठी ठोस पावले उचलण्याच्या दृष्टीने आश्वस्त केल्याबद्दल बांधकाम व्यावसायिक, उद्योजक, व्यापारी, व्यावसायिक यांनी आभार व्यक्त केले.

# मराठी तरुणांनी आवडीच्या क्षेत्रात समर्पित भावनेने काम करावे

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२२, नवी दिल्ली :** मराठी तरुणांनी आपल्या आवडीच्या क्षेत्रात समर्पित भावनेने काम केल्यास निश्चित यश मिळते, असा सूर अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या दुसऱ्या दिवशीच्या पहिल्या सत्रातील मराठी पाऊल पडते पुढे या चर्चासत्रात उमटला.

नवी दिल्ली येथे आयोजित अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या दुसऱ्या दिवसातील पहिल्या सत्रात मराठी पाऊल पडते पुढे या डॉ. बाबासाहेब आंबेडकर व्यासपीठावर आयोजित चर्चासत्रात बीव्हीजी समूहाचे हणमंतराव गायकवाड, ज्येष्ठ उद्योजक रवी पंडित, ज्येष्ठ पत्रकार पराग करंदीकर व वृत्त निवेदक प्रसन्ना जोशी सहभागी झाले होते.

श्री हणमंतराव गायकवाड म्हणाले, मराठी संस्कृती दहीहंडीसारखी असावी, एकमेकांना हातभार लावून पुढे नेणारी असावी. प्रत्येकाने आपल्या आयुष्यात आपल्याला काय काम करायचे आहे ते ठरविणे महत्त्वाचे आहे. प्रत्येकाची आनंदाची व्याख्या वेगवेगळी आहे, आपल्याला ज्या क्षेत्रात आनंद मिळतो तो मिळवावा असे सांगतानाच मला रोजगार, आरोग्य व शेतकरी बांधवांसाठी काम करण्यात आनंद आहे. असे काम करा असा सल्लाही त्यांनी दिला.

मराठी तरुणांनी आपले आवडते क्षेत्र निवडावे व त्या क्षेत्रात झोकून देऊन काम करावे, असे सांगून श्री गायकवाड म्हणाले, आपल्या देशाच्या प्रगतीसाठी देशातील शेतकऱ्यांची प्रगती अत्यंत महत्त्वाची आहे. गावातच सर्व सुविधा मिळतील अशा दृष्टीने नियोजनही महत्त्वाचे आहे. गावातच उत्पन्नाचे स्रोत कसे वाढविता येतील त्यासाठी काम करावे लागणार आहे. आपण दहा लाख रोजगार निर्मितीचे उद्दिष्ट ठेवून काम करत असल्याचेही श्री गायकवाड यांनी सांगितले.

छत्रपती शिवाजी महाराज व स्वामी विवेकानंद यांचा आदर्श समोर ठेवून आपण काम करत असल्याचे सांगून श्री. गायकवाड म्हणाले, बीव्हीजी समूहाचा आठ लोकांचा प्रवास आज एक लाख लोकांपर्यंत पोहोचला आहे. अमेरिकेतही बीव्हीजी ग्रुप काम करत असून जगभर बीव्हीजी ग्रुपच्या माध्यमातून काम विस्तारण्याचा आमचा प्रयत्न आहे. जगात खूप संधी आहेत संधीचा आपण शोध घेतला पाहिजे. कोणतेही काम लहान नाही. आपण निवडलेले काम समर्पित भावनेने करा, असे श्री गायकवाड म्हणाले.

उद्योजक रवी पंडित म्हणाले, आपण आपल्या क्षेत्रात काम




करताना ते काम चांगले असेल तर तेच काम आपली ओळख निर्माण करते. आपल्या वागण्या बोलण्यातून आपले व्यक्तिमत्व ठरते. आपण आपल्या क्षेत्रात ध्येयाने प्रेरित असाल तर लोकही मागे उभे राहतात. त्यासाठी आपला उद्देश चांगला पाहिजे. नवीन उद्योजक स्वतःच्या बळावर पुढे जात आहेत. छत्रपती शिवाजी महाराज, संत ज्ञानेश्वर महाराज, संत तुकाराम महाराज यांचा आदर्श महत्त्वाचा आहे. आपल्या देशाला पुढे नेण्यासाठी प्रत्येकाला आपल्या क्षेत्रात समर्पित भावनेने काम करावे लागणार आहे. उल्लेख श्री पंडित यांनी यावेळी केला.

ज्येष्ठ पत्रकार श्री पराग करंदीकर म्हणाले, प्रत्येक क्षेत्रात मराठी पाऊल पुढे पडते आहे ही आनंदाची बाब आहे. आपल्याला प्रगतीसाठी सर्वसामावेशक व्हावे लागणार आहे. आपण ज्या क्षेत्रात काम करतो त्या क्षेत्रातील छोट्या-मोठ्या नोंदी आपल्याला ठेवाव्या लागणार आहेत. इतिहासाचे भान ठेवून वर्तमान कवेत घेऊन भविष्याचे नियोजन करावे लागणार आहे. वर्तमानाचा वेध घेताना भविष्याची बांधणी होऊ शकते असेही ते म्हणाले.

प्रत्येकाने आपले ध्येय साध्य करण्यासाठी सर्वतोपरी व प्रामाणिकपणे केलेले प्रयत्न महत्त्वाचे आहेत. आपल्याला वेळेचे नियोजन अत्यंत बारकाईने करावे लागणार आहे. प्रत्येक गोष्ट शिकण्याची वृत्ती बाळगावी यश निश्चित मिळेल असा विश्वास श्री करंदीकर यांनी व्यक्त केला.

वृत्त निवेदक प्रसन्ना जोशी यांनी देशाने उद्योग तसेच विविध क्षेत्रातल्या प्रगतीत आपला सहभाग, उद्योजकांचे योगदान व सद्यस्थितीत सुरू असलेल्या बदलाबाबत प्रश्न मांडण्याचा प्रयत्न केला. मराठी पाऊल पडते पुढे या चर्चासत्राला रसिकांनी भरभरून प्रतिसाद दिला.

## मंत्रीमंडळात असताना आरोप झाले तर क्षणात राजीनामा घ्या अण्णा हजारेंचे सूचक विधान !

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२२, अहिल्यानगर :** महायुतीतील राष्ट्रवादीचे अन्न आणि पुरवठा मंत्री धनंजय मुंढे यांच्यावर सातत्याने भ्रष्टाचाराचे आरोप होत आहेत तर दुसरीकडे मुख्यमंत्री कोट्यातून दिल्या जाणाऱ्या सदनिका बनावट दस्तऐवज देऊन लाटल्याच्या प्रकरणात कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांना प्रत्येकी दोन वर्षाचा कारावास आणि ५० हजार रुपये दंडाची शिक्षा झाल्यामुळे राजकीय वर्तुळात खळबळ उडाली. यावरून चांगलेच राजकारण तापले. दरम्यान, या सर्व घडामोडींबाबत जेष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी सूचक




भाष्य केले आहे. मंत्रिमंडळात असताना जेव्हा आरोप होतात तेव्हा एक क्षण सुद्धा पदावर राहणे चुकीचे आहे. लगेच राजीनामा देऊन मोकळे झालं पाहिजे ,असं अण्णा हजारे यांनी म्हटले आहे. बीड जिल्ह्यातील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांची काही दिवसांपूर्वी हत्या झाल्याची घटना घडली. या घटनेनंतर राज्यातील राजकारण चांगलंच ढवळून निघालं. या घटनेवरून सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये आरोप - प्रत्यारोपांच राजकारण सुरू आहे. तसेच खंडणी प्रकरणातील आरोपी वाल्मिक कराड हा मंत्री धनंजय मुंडे यांचा निकटवर्तीय असल्याचा आरोप विरोधक करत आहेत. यावरून मंत्री धनंजय मुंडे यांचा विरोधकांकडून राजीनामा मागितला जात आहे. तसेच भाजपचे आमदार सुरेश धस आणि सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी धनंजय मुंडे यांच्या विरोधात अनेक आरोप केले आहेत.

## विधानभवनात विधिमंडळ कामकाज सल्लागार समितीची बैठक

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२३, मुंबई :** महाराष्ट्र विधिमंडळाचे अर्थसंकल्पीय अधिवेशन सोमवार, दिनांक ०३ मार्च ते २६ मार्च या कालावधीत पार पडणार आहे. या अनुषंगाने रविवार, दिनांक २३ फेब्रुवारी २०२५ रोजी विधानभवन मुंबई येथे विधिमंडळ कामकाज सल्लागार समितीची बैठक मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, विधानसभा अध्यक्ष अॅड. राहुलजी नार्वेकर, विधान परिषदेचे सभापती प्रा.राम शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडली. सभागृहात दिनांक १० मार्च रोजी राज्याचा अर्थसंकल्प मांडण्यात येणार आहे. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार, सहकारी मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, गिरीश महाजन, छगन भुजबळ, आ.प्रसाद लाड, आ.प्रवीण दरेकर, आ.अनिल परब, विधानमंडळ सचिवालयाचे सचिव जितेंद्र भोळे व इतर संबंधित अधिकारी उपस्थित होते. अर्थसंकल्पीय अधिवेशन कालावधीत शनिवार दि. ८ मार्च सार्वजनिक सुटीच्या दिवशी विधिमंडळाचे कामकाज सुरू राहील, तर १३ मार्च होळीनिमित्त कामकाजास सुटी देण्याचे या बैठकीत ठरविण्यात आले.

## हजरत मियाँशा खादरी प्राथमिक मा.उर्दू शाळेत भौतीक सुविधांचा अभाव

### स्वराज्य संग्राम संघटनेचे उपोषण सुरू...

**अक्षराज : जयराम देमगुंडे**

**दि.२२, उदगीर (लातूर) :** शाळेच्या कार्यकारनीचे वीस वर्षा पासुन भांडण कोर्टात सर्व कार्यभार मुख्याध्यापक बगतो मात्र कसलीच सुविधा पुरवत नाही. वाढवणा येथील हजरत मियांशा उर्दू प्राथमिक व माध्यमिक शाळेत भौतीक सुविधांचा अभाव असल्यामुळे शाळेची मान्यता काढून घेण्यात यावे या मागणीसाठी स्वराज्य संग्राम संघटनेच्या वतीने शिक्षणाधिकारी जिल्हा परिषद लातूर येथे आमरण उपोषणास बसले आहेत.

सविस्तर वृत्त असे की, वाढवणा बुद्रुक येथील हजरत मियांशा प्राथमिक शाळा पहेली ते सातवी इयत्ता पर्यंत १०० टक्के अनुदानित असुन देखील भौतिक सुविधेचा अभाव आहे. शाळेत ७५ टक्के मुली अध्यापन कार्यासाठी येतात मात्र येथे पोषण आहार देखील मेनू प्रमाणे दिले जात नाही ४० वर्ष जुनी शाळा असुन देखील आज तागायत शाळेत पोषण आहार चुलीवरच गॅस कनेक्शन देखील मुख्याध्यपकाने घेतला नाही संस्थाचालकात भांडण तंटे कोर्टात गेल्यामुळे पूर्ण जवाबदारी मुख्याध्यापक सांभाळत आहे गोरगरीब अल्पसंख्यांक मजूरदाराची मुले मुली अध्ययन कार्या साठीयेत आहेत मात्र शाळेच्या भिंतीला सजावट रंगरंगोटी केले नाही, खिडक्या बसविले नाहीत




अशुद्ध पाणी, शौचालय मुतारीत अस्वछता दरवाजे देखील नाहीत मुलींना अडोसा धरून लघु शंका करावी लागते या मुळे त्रास होत आहे स्वच्छतेचा अभाव दिसत असुन देखील संबंधित प्रशासन मुग गिळून गप्प का? असा प्रश्न पालकांना भेडसावत आहे माध्यमिक शाळेला अनुदान नाही मात्र येथे देखील भौतीक सुविधा नाही. त्यामुळे मुलींना फार मोठ्या अडचणींना तोंड द्यावे लागत आहे. प्रा. मा.वर्ग पत्र्याच्या शेड मध्य भरते त्या शाळेला ना खिडकी ना उजेड, एखाद्या गोठ्यात बसून जनावरा सारखे विद्याथ्यर्थ्यांना मांड्या घालून बसावे लागते. ही शाळा उन्हाळ्यात गरम होते, उखडते, येथे शौचालय, मुतारी, नाही त्यामुळे विद्यार्थ्यांना व विद्यार्थीनींना लघुशंका करण्यासाठी शाळेच्या पाठी माघे आडोशाला जावे लागते. प्राथमिक शाळा पूर्ण अनुदानित असून देखील येथे भौतीक सुविधांचा अभाव आहे. या शाळेत प्रयोगशाळा नाही. येथे मध्यांतर चे भोजन चुलीवर केले जाते. पाणी अशुध्द आहे. त्यामुळे येथील विद्यार्थ्यांना पाणी पिण्यासाठी घरून आणावे लागते. शासन लाखो रूपये खर्च करून, बालकांना चांगले शिक्षण देण्याचा अट्टाहास करते. पण हे संस्था चालक मुख्याध्यापक आपल्या या शाळेत भौतीक सुविधा देऊ शकत नाही. आशा प्रकारच्या शाळेची चौकशी करून या शाळेची मान्यता काढून घ्यावे. अन्यथा तिव्र आंदोलन छेडण्यात येईल.असा ईशारा स्वराज्य संग्राम संघटनेच्या वतीने २४ जानेवारी रोजी दिले होते. पण संबंधित विभागाने दखल घेतली नाही दिलेल्या तक्रारीचा उपयोग न झाल्यामुळे संघटनेच्या वतीने जिल्हा संघटक सुनिल शिवराज कांबळे यांनी १७ फेब्रुवारी पासून उपोषण सुरु केले आहे. याच्या प्रती माहितीसत्व मुख्यकार्यकारी अधिकार , जिल्हा परिषद लातूर, शिक्षणाधिकारी लातूर, गट शिक्षणाधिकारी पंचायत समिती उदगीर यांना दिले आहेत.

## वन्यमंत्री मंत्री नाईक यांनी कार्यकत्यांसह ऐकला 'मन की बात' कार्यक्रम

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२३, नवी मुंबई :** रविवार, दिनांक २३ फेब्रुवारी २०२५ रोजी देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मन की बात कार्यक्रमाच्या ११९ व्या भागाच्या माध्यमातून देशाच्या नागरिकांसमवेत संवाद साधला. यावेळी वन्यमंत्री मंत्री गणेश नाईक यांनी पक्ष कार्यकर्ते तसेच पदाधिकारी व नागरिक यांच्या सम वेत हा संवाद ऐकला असे दिसून आले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अधोरेखित केल्याप्रमाणे, वन्यजीव संवर्धन हे आपल्या पर्यावरणीय संतुलन आणि सांस्कृतिक वारशाचे जतन करण्यासाठी महत्वाचे आहे. आशियाई सिंहांपासून ते पूर्वो त्तर क्षेत्रात असणाऱ्या गेंड्यांपर्यंत भारतातील समृद्ध जैवविविधता स्थानिक समुदायाच्या सम र्पणामुळे भरभराटीला येते. जागतिक वन्यजीव दिन जवळ येत असताना, आपण मानव आणि निसर्ग यांच्यातील सुसंवाद सुनिश्चित करणाऱ्या प्रयत्नांना पाठिंबा देऊया.

वन्यमंत्री म्हणून, मी सर्वांना आपल्या वन्यजीव आणि नैसर्गिक वारशाचे रक्षण करण्यासाठी



योगदान देण्याचे आवाहन करतो. असे श्री.नाईक यांनी यावेळी सांगितले.

**या सत्रात त्यांनी अन्य महत्वपूर्ण घडामोडींवर प्रकाश टाकला : -**

**✻ इस्रोचे १०० वे प्रक्षेपण** – अवकाश तंत्रज्ञानातील भारताच्या वाढत्या क्षमता दर्शविणारी एक ऐतिहासिक कामगिरी.

**✻ अवकाश क्षेत्रात म हिलांचा वाढता सहभाग** – भारताच्या अवकाश प्रयत्नांमध्ये महिलांची महत्त्वाची भूमिका मान्य करणे.

**✻ कृत्रिम बुद्धिमत्तेमध्ये भारताची महत्त्वपूर्ण प्रगती** – एआयमधील देशाच्या प्रगती आणि विविध क्षेत्रांमध्ये परिवर्तन घडवून आणण्याच्या क्षमतेवर प्रकाश टाकणे.

**✻ देशभरातील ८९ कोटी लोकांसाठी रक्तदाब, साखर आणि कर्करोगासाठी मोफत आरोग्य तपासणी** – सार्वजनिक आरोग्य सेवा मजबूत करण्यासाठी एक मोठे पाऊल.

**✻ महिला दिन उपक्रम** – महिला दिनाच्या सन्मानार्थ, पंतप्रधान मोदींनी महिला सक्षम ीकरणासाठी एक महत्त्वाचे पाऊल सादर केले, जे सरकारच्या लैंगिक समानतेसाठी वचनबद्धतेचे प्रतिबिंब आहे.

**✻ बालपण स्थूलता** – पंतप्रधान मोदींनी अधोरेखित केले की भारतात बालपण स्थूलता ही एक महत्त्वाची समस्या बनत आहे आणि दीर्घकालीन आरोग्य समस्या टाळण्यासाठी संतुलित जीवनशैलीला प्रोत्साहन देणे आवश्यक आहे.

## क्लस्टर योजना कोणत्याही परिस्थितीत विकासकांना आंदण देऊ नका

### आ.संजय केळकर यांचे ठामपा प्रशासनाला खडे बोल

**अक्षराज : विकास दळवी**

**दि.२२, ठाणे :** ठाणे म हापालिका क्षेत्रातील धोकादायक, अतिधोकादायक अन् अनधिकृत इमारती आणि झोपडपट्ट्याच्या पुनर्विकासासाठी क्लस्टर योजना क्रांतीकारक आहे. मात्र चुकीच्या पद्धतीने व्यवहार करून ठाणे महापालिका प्रशासनाने क्लस्टर योजना विकासकांना कोणत्याही परिस्थितीत आंदण देऊ नका. असे खडे बोल आमदार संजय केळकर यांनी सुनावले आहेत.

आ. केळकर यांनी नागरीकांसमवेत ठाणे म हापालिकेच्या संबधित अधिकाऱ्यांची भेट घेऊन विस्तृत चर्चा केली. भाजप - शिवसेना युती सरकारच्या काळात तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि एकनाथ शिंदे यांनी ठाणे शहरात क्लस्टर योजना राबवण्याचा निर्णय घेतला.

त्यानुसार पालिका क्षेत्रात विविध भागात ४८ युआरपी तयार करण्यात आले. क्लस्टर सारख्या महत्वाकांक्षी योजनेला मूर्त स्वरूप मिळत असताना शहरातील मानपाडा, अशोक नगर, आझादनगर, गणेश नगर



तसेच मनोरमा नगर भागात कार्यालय थाटुन दंडेलशाही करणाऱ्या विकासकाच्या विरोधात नागरीकांमध्ये क्लस्टर बाबत संभ्रमाचे वातावरण आहे.

यापूर्वी अधिवेशनात आ. केळकर यांनी अशा हजारो झोपडीधारकांची बाजू ठामपणे मांडली असल्याने या भागातील नागरीकांनी क्लस्टर संदर्भातील तक्रारींचा पाढा आ. संजय केळकर यांच्याकडे वाचल्यावर आ.केळकर यांनी नागरीकांसह थेट ठाणे महापालिका मुख्यालयात संबधित अधिकाऱ्यांची भेट घेतली.

यावेळी, नागरीकांनीही अधिकाऱ्यांकडे क्लस्टर संदर्भातील शंका मांडल्या. यावर अतिरिक्त आयुक्त प्रशांत रोडे आणि अन्य अधिकाऱ्यांनी वस्तुस्थिती मांडल्यानंतर क्लस्टर साठी झोपड्यांचे सर्वे क्षण म्हणजे अंतिम मंजुरी नसल्याचा विश्वास रहिवाश्यांना दिला. तसेच क्लस्टरविषयी शंका असेल तर प्रशासनाने जाहिर सभा अथवा बैठका घेऊन रहिवाश्यांचे शंका निरसन करावे. त्याचबरोबर वैयक्तिक पातळीवरही तक्रारदारांच्या तक्रारी ऐकुन घ्याव्यात. असे सक्त निर्देश देत क्लस्टर योजना विकासकाला आंदण देऊ नका, असे प्रशासनाला आ. केळकर यांनी बजावले.

## जलंब, पिंपळगाव राजा पोलीस ठाण्याच्या नवीन इमारतींचे भूमिपूजन

### बदलत्या काळानुरुप पोलीस खाते अद्ययावत, सुविधायुक्त असावे - ॲड. फुंडकर

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२२, खामगांव (बुलडाणा) :** लोकांमध्ये शांतता आणि कायद सुव्यस्था राखण्यात पोलीसांची महत्त्वाची भूमिका असते. बदलत्या काळानुसार पोलीस खाते अद्ययावत, सर्व सुविधायुक्त असले पाहिजेत, असे प्रतिपादन कामगार मंत्री ॲड.आकाश फुंडकर यांनी शनिवार, दिनांक २२ फेब्रुवारी २०२५ रोजी येथे केले.

खामगाव विधानसभेचे आमदार तथा राज्याचे कामगार मंत्री ॲड आकाश फ ुंडकर यांच्या प्रमुख उपस्थितीत जलंब आणि पिंपळगाव राजा पोलीस स्टेशनच्या नवीन इमारत बांधकामाचे भूमिपूजन व कोनशिलेचे अनावरण करण्यात आले. त्यावेळी ना.ॲड फुंडकर बोलत होते. या कार्यक्रमात अमरावती परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक रामनाथ पोकळे, पोलीस अधीक्षक विश्व पानसरे, अपर पोलीस अधीक्षक अशोक थोरात, पोलीस उप अधीक्षक कारखेडे, तहसिलदार दिपक बाजड आदी अधिकारी व पोलीस कर्मचारी उपस्थित होते.

ना.ॲड आकाश फुंडकर म्हणाले, जीवाची पर्वा न करता काम करणाऱ्या पोलीसांना हक्काचे कार्यालय असावे यादृष्टीने गेल्या तीन-चार वर्षांपासून प्रयत्न करत होतो. जिल्ह्यातील हिवरखेड, जलंब, पिंपळगाव राजा, खामगाव ग्राम ीण, पोलीस उप अधीक्षक, अतिरिक्त पोलीस अधीक्षक कार्यालय इमारतींची मागणी केली आहे. लवकरच कार्यादेश आणण्याचा प्रयत्न आहे. शासनाकडून पोलीसांना सुविधा दिल्या जात आहेत. त्याप्रमाणे पोलीसांकडूनही लोकांना सर्व सोयीसुविधा मिळाल्या पाहिजेत,असे निर्दे श त्यांनी दिले.

**लोकांना मदतीचा हात द्या ! -**

जलंब, पिंपळगाव राजा पोलीस स्टेशनची प्रशस्त इमारत लोकांच्या सेवेत लवकरच रुजू होईल आणि लोकांवरील



अन्याय दूर करून त्यांना मदतीचा हात देत पोलीस विभाग परिसरात चांगले वातावरण निर्माण करेल, असा विश्वास मंत्री ना.ॲड.आकाश फुंडकर यांनी व्यक्त केला.

**पोलीस गृहसंकुल यासाठी प्रयत्नशील -**

विधानसभा आचारसंहितेमुळे थांबलेल्या पोलीस गृहसंकुलाच्या प्रस्तावांना मान्यता मिळण्यासाठी प्रयत्नरत आहे. सर्व प्रस्ताव पोलीस महासंचालक यांच्याकडे पाठविण्यात आले आहेत. पोलीस गृहसंकुलाचे सर्व प्रस्तावांना तात्काळ मंजूरी मिळविण्यासाठी पाठपुरावा करणार असल्याचे मंत्री ॲड. आकाश फुंडकर यांनी यावेळी सांगितले.

स्वातंत्र्यपूर्व आणि आत्ताच्या पोलीसांच्या कार्यपद्धतीत मोठे बदल झाले आहे. माहिती तंत्रज्ञानामुळे पोलीस प्रशासनात वेगवेगळ्या शाखा स्थापन झाल्या आहेत.

जुन्या पोलीस स्टेशनची जागा अपुरी पडत होती. परिणामी लोकांना उभे राहावे लागत होते. त्यामुळे लोकांना चांगल्या सुविधा देण्यासाठी या नवीन इमारतीमध्ये विविध शाखा, सीसीटिएनएस अंतर्गत ऑनलाईन एफआयआर सुविधा, ॲम्बीश प्रणाली, सीसीटिव्ही यंत्रणा शासनाच्यावतीने सुरु करण्यात येईल. जिल्ह्यातील ३३ पैकी आठ पोलीस स्टेशनच्या नवीन इमारती झाल्यात आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सात कलमी कृती आराखड्यांतर्गत आज दोन इमारतींचे भूमिपूजन झाले असून तीन इमारतीचे कार्यादेश झाले आहेत.

येत्या काळात हे पोलीस स्टेशन नव्या रुपात जनतेच्या सेवेत येत असल्याचे मनोगत विशेष पोलीस महानिरीक्षक राम नाथ पोकळे यांनी व्यक्त केले.

## डीपीसीचा निधी वाढवून मागणार, पर्यटन व पर्यावरणाकडे लक्ष देणार

### आत्तापर्यंतचा सर्वात चांगला अर्थसंकल्प - अतुल सावे

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२३, नांदेड :** या वर्षी सादर करण्यात आलेला केंद्राचा अर्थसंकल्प हा आतापर्यंतचा सर्वात चांगला अर्थसंकल्प असून शेतकरी, व्यापारी, मध्यमवर्गीय यांना सुखावणारा अर्थसंकल्प केंद्रातील प्रधानमंत्री मोदी यांच्या नेतृत्वातील केंद्र शासनाने सादर केला आहे, असे प्रतिपादन राज्याचे इतर मागास बहुजन कल्याण, दुग्धविकास, अपारंपारिक ऊर्जा मंत्री तथा नांदेड जिल्ह्याचे पालकमंत्री अतुल सावे यांनी केले.

पालकमंत्री एक दिवसाच्या नांदेड दौऱ्यावर आले आहेत. महसूल विभागाच्या राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धांचा समारोप आहे. समारोपीय सत्रामध्ये बक्षीस वितरणासाठी ते आले होते. यावेळी त्यांनी नांदेड येथील शासकीय विश्रामगृहात पत्रकारांशी संवाद साधला. यावेळी राज्यसभेचे खासदार डॉ.अजित गोपछेडे व अन्य मान्यवर उपस्थित होते.

या अर्थसंकल्पाचे पालकमंत्र्यांनी भरभरून कौतुक केले. बारा लाखापर्यंतचे उत्पन्न करमुक्त केले आहे. त्यामुळे सर्वांसाठी उपयुक्त असा अर्थसंकल्प असल्याचे स्पष्ट केले. त्यांनी वर्षीचा केंद्रीय अर्थसंकल्प हा सर्वसामान्यांच्या मनातला अर्थसंकल्प होता अनेक व्यापाऱ्यांनी मला स्वतः फोन करून केंद्र सरकारच्या अर्थसंकल्पासंदर्भात स्वागत केल्याचे त्यांनी सांगितले.

किसान क्रेडिट कार्ड ची व्याप्ती ५ लाखापर्यंत करण्यात आली आहे तसेच शेतकऱ्यांच्या संदर्भातील अनेक महत्त्वपूर्ण निर्णय या अर्थसंकल्पात घेण्यात आले असून नव्या जमान्याच्या आरटीफिसीएल इंटेलिजन्सचा वापर भारताच्या सर्व क्षेत्रातील विकासासाठी करण्याकडे केंद्र शासनाचा कल आहे, असे त्यांनी सांगितले.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी पाहिलेले विकसित भारताचे स्वप्न साकारणारा हा अर्थसंकल्प असून या देशाला आर्थिक महासत्ता बनविण्याच्या दृष्टीने टाकलेले महत्त्वपूर्ण पाऊल असल्याचेही त्यांनी यावेळी अर्थसंकल्पावरील आपल्या निवेदनात स्पष्ट केले.

या अर्थसंकल्पामध्ये कृषी क्षेत्रासाठी १ लक्ष ३७ हजार ७ ५६ कोटीची तरतूद करण्यात आली आहे. ग्रामीण विकासासाठी एक कोटी ९० लक्ष ४०५ कोटींची तरतूद करण्यात आली आहे. रेल्वेसाठी दोन लक्ष ५५ हजार ४४५ कोटींची तरतूद केली आहे यामध्ये सर्वाधिक लाभ हा महाराष्ट्राचा होणार आहे महाराष्ट्रामधील रेल्वे प्रकल्पाला गती देणारा हा अर्थसंकल्प असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

तत्पूर्वी ,पत्रकारांशी बोलताना त्यांनी नांदेडच्या डीपीसीचा निधी निश्चित वाढून




मागू. त्यासाठी आपण प्रयत्न करणार असल्याचे सांगितले. नांदेड परिसरात म ोठ्या प्रमाणात उद्योग व्यवसायात गुंतवणूक झाली पाहिजे. या संदर्भात प्रयत्नरत असून या ठिकाणी राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय दर्जाचे उद्योग समूह यावेत. यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे आग्रह धरणार असल्याचे ही त्यांनी सांगितले.

नांदेड येथे आयुक्तालय आणण्याच्या संदर्भातला निर्णय मुख्यमंत्री व महसूल मंत्री यांच्या अखत्यारीतील असून त्यांचे त्यांचे त्याबद्दलचे काय मत आहेत हे नक्की जाणून घेऊ असे त्यांनी सांगितले. नांदेडच्या पर्यटनाच्या विकासाबद्दल, गोदावरी नदीच्या स्वच्छता व पर्यटन वृद्धीसाठी पालकमंत्री म्हणून अतिशय जबाबदारीने प्रयत्न केले जातील अशी ग्वाही त्यांनी यावेळी दिली.

## पिंपरी- चिंचवड मध्ये ९६ किलो गांजा जप्त; अंमली पदार्थ विरोधी पथकाची कारवाई

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२२, पिंपरी-चिंचवड :** पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या अंमली पदार्थ विरोधी पथकाने गांजा तस्करी करणाऱ्या महिलेसह एकूण ३ जणांना अटक केली आहे. आरोपींकडून ९६ किलो गांजा, दोन चार चाकी वाहनासह ६३ लाखांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

ही कारवाई चाकण पोलीस ठाण्याच्या हद्दीत करण्यात आली. संजय पांडुरंग मोहिते, मनसाराम नूरजी धानका यांच्यासह महिलेला अटक करण्यात आली आहे. सहाय्यक पोलीस निरीक्षक विक्रम



गायकवाड हे पोलीस अंमलदार निखिल वर्पे यांच्यासह गस्त घालत होते. २ चारचाकी वाहनांमधून गांजाची तस्करी केली जात आहे. अशी गुप्त माहिती बातमीदार मार्फत मिळाली.

पुणे- नाशिक महामार्गावरील रोहकल फाटा या ठिकाणी नाकाबंदी करून दोन्ही वाहन ताब्यात घेण्यात आली. दोन्ही वाहनातील एकूण तीन जणांना पोलिसांनी ताब्यात घेतलं. त्यांच्याकडे विचारपूस करण्यात आली.


यात एका महिलेचा देखील समावेश होता. अंमली पदार्थ विरोधी पथकाचे सहाय्यक पोलीस निरीक्षक संतोष पाटील यांच्या समक्ष वाहन तपासल्यानंतर दोन्ही वाहनात एकूण ६ पोत्यांमध्ये ९६ किलो २०४ ग्रॅम गांजा आढळून आला. संजय पांडुरंग मोहिते, म नसाराम नूरजी धानका यांच्यासह महिलेला अटक करण्यात आली आहे.

यापैकी संजय मोहिते याच्यावर कामशेत आणि लोणी काळभोर पोलीस ठाण्यात एन.डी.पी.एस अंतर्गत गुन्हे दाखल आहेत. ही कारवाई पोलीस आयुक्त विनयकुम ार चौबे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

## संत गाडगे बाबा जयंतीनिमित्त नमुंमपा मुख्यालयात अभिवादन

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.२३, नवी मुंबई :** महानगरपालिकेच्या वतीने महापालिका मुख्यालयात ॲम्फिथिएटर येथे संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेस प्रशासन विभागाचे उपआयुक्त शरद पवार यांच्या शुभहस्ते पुष्पमालिका अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते. महाराष्ट्रातील समाजवादाचे प्रचंड व्यासपीठ अशा शब्दात आचार्य अत्रे यांनी गौरव केलेले गाडगे महाराज थोर कर्मयोगी संत होते. समाजातील अज्ञान, अंधश्रध्दा, अस्वच्छता दूर करण्यासाठी त्यांनी कीर्तनासारख्या लोकप्रिय माध्यमाचा प्रभावी वापर करुन लोकजागृती केली. अनाथ, रंजल्या गांजल्यांसाठी मोठ्या संख्येने धर्मशाळा, आश्रम, शाळा सुरु करुन त्यांनी समाजाला शहाणे करण्यासोबतच हक्काचा आधार दिला. कोणताही समाजोपयोगी संदेश स्वकृतीतून पटवून देणाऱ्या गाडगे महाराजांचे स्मरण करीत त्यांनी दिलेला स्वच्छतेचा मंत्र नवी मुंबई महानगरपालिका मनापासून जपत असून त्यादृष्टीने स्वच्छता कार्याला लोकचळवळीचे स्वरुप दिले जात आहे.




## थोडक्यात बातम्या

## भारताच्या 'फार्मा सेक्टर'ची जागतिक बाजारात यशस्वी वाटचाल...

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२२, मुंबई :** मोदी सरकार देशातच नव्हे, तर देशाबाहेरही उद्योगवाढीसाठी करत असलेले प्रयत्न यशस्वी होताना दिसत आहेत. भारतातील 'फार्मास्युटिकल मार्केट' मोदी सरकारच्या निरंतर प्रयत्नांनी वाढत आहे. बेन ॲण्ड कंपनीच्या रिपोर्टनुसार भारताचे फार्मा क्षेत्र हे मोठ्या वाढीसह उज्ज्वल भविष्याकडे वाटचाल करत आहे. ५ वर्षांत भारताच्या 'फार्मास्युटिकल सेक्टर'ची जागतिक बाजारातील हिस्सेदारी वाढून पाच टक्क्यांपर्यंत पोहोचणार आहे. आज ५५ बिलियन डॉलर असलेले फार्मा मार्केट २०३० पर्यंत १२० ते १३० बिलियन डॉलर आणि २०४७ पर्यंत ४५० बिलियन डॉलरपर्यंत पोहोचण्याची शक्यता आहे.




## क्लस्टरच्या पहिल्या इमारतीचे १७ मजले राहिले उभे

**अक्षराज : विकास दळवी**

**दि.२२, ठाणे :** क्लस्टर योजना अर्थात समुह पुनर्विकास योजना पहिल्यांदा ठाण्यासाठी जाहीर झाली. ५ जुन २०२३ रोजी या ठिकाणी क्लस्टरच्या पहिल्या प्रकल्पाचा शुभारंभ झाला होता. तेव्हापासुन ठाण्यात क्लस्टर योजने संदर्भात नागरिकांचे अनेक प्रश्न आहेत. काही ठिकाणच्या नागरिकांनी याला तीव्रतेने विरोध केला.काहींच्यामध्ये समज गैरसमज असतानाच आता ठाण्यातील क्लस्टरची पहिली इमारत नावा रुपाला येत आहे. महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री सध्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मतदारसंघातील किसन नगर भागात पहिल्या इमारतीचे काम आता शेवटच्या टप्प्यात आले असून इमारतीचे १७ मजले देखील उभे झाले आहेत. त्याम ुळे लवकरच धोकादायक इमारतीत जीव मुठीत घेऊन राहणाऱ्यांना या इमारतीत हक्काचे घर मिळणार आहे. रबर इंडिया कंपनीच्या इम ारतीचे सहा मजले ही तयार झाले असून या दोन्हीही इमारतीचे काम वर्षभराच्या आतच पूर्णत्वास येईल असा विश्वास ठाणे महापालिकेने व्यक्त केला आहे. ठाण्यात धोकादायक इमारतीत वास्तव्यास असलेल्या लाखो कुटुंबांना क्लस्टर योजना हा एक आधार ठरणार आहे. ठाणे महानगरपालिका हद्दीत क्लस्टरचे ४४ युआरपी मंजूर करण्यात आले आहेत. यातील प्रत्येक सदनिका ३२३ चौरस फूट क्षेत्रफळाची असुन पंधराशे हेक्टर मध्ये हा सर्वात मोठा क्लस्टर डेव्हलपमेंट चा प्रकल्प आहे. बुश कंपनी, फेरोडाय ,रबर इंडिया, मुंबई महापालिका, एमआयडीसी इत्यादी भूखंडावर पहिल्या टप्प्यातील या क्लस्टरचे काम चालू आहे. यामध्ये रस्ते, उद्यान, व्यायामशाळा, रुग्णालय, मंदिर आदींसह इतर सुविधांचा ही समावेश आहे. दीड दोन वर्षातच येथील दोन इमारती आता खऱ्या अर्थाने आकार घेताना दिसत आहेत. या इमारतीत १४०० घरे उपलब्ध होणार असून एकूण १८ मजल्यांच्या याइमारतीला तीन विंग असणार आहेत.



## हिमोफिलिया रूग्णांमधील कमतरता भविष्यकाळात भरून निघेल - डॉ.लोडे

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२३, अहिल्यानगर :** परदेशात ज्या प्रमाणे संशोधनाच्या प्रमाणात वाढ होत आहेत. तसेच आपल्या देशातही संशोधन वाढत असून हिमोफिलिया रूग्णांसाठी असणारी घटकाची कमतरता भविष्यकाळात भरून निघेल असे मत जी एस घुणे आर्युवेद कॉलेजचे प्राचार्य डॉ.दत्तात्रय लोडे यांनी केले. जी.एस घुणे आर्युवेद कॉलेज येथे आयोजित हिमोफिलिया कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी आर्युवेद हॉस्पिटलचे निवासी वैदयकीय अधिकारी डॉ.समिर होळकर, वैद्यकीय अधिकारी डॉ.रूपाली कुलकर्णी, फिजिओथेरपीस्ट डॉ. अमृता गवळी, नगरसेवक रविंद्र बारस्कर, हिमोफिलिया सोसायटी अहमदनगर चॅप्टरचे अध्यक्ष दादा भालेकर, इंटास फाऊंडेशनचे सुरज माळी, डॉ.ज्ञानदेव आव्हाड, अरूण पानसंबळ आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी डॉ.गोडे म्हणाले की, आज हिमोफिलियामध्ये परदेशात नवनविन तंत्रज्ञान विकसीत झाले असून त्यावर योग्य अशी चाचणी चालू आहे.त्यामुळे भविष्यकाळात याचा फायदा देशाला नक्की होवून हिमोफिलिया रुग्णांच्या शरिरात जे काही घटकाची कमतरता होती ती नक्कीच भरून निघेल व हिमोफिलिया रूग्णांना सर्वसामान्यां सारखे जिवन जगता येईल. यावेळी डॉ. होळकर म्हणाले की, हिमोफिलिया रुग्णांची वाढती संख्या पाहता आर्युवेदात काही करता येईय का यासाठी जी एस घुणे आर्युवेद हॉस्पिटल सदैव कटीबध्द राहून भविष्यकाळात हिमोफिलियासाठी स्वतंत्र सेंटर चालू करण्याचा प्रयत्न करणार आहे. ताण, तणाव मुक्त होवून वेदनामुक्त जिवनासाठी आर्युवेदामध्ये काही करता येईल का यासाठी संशोधन चालू असून हिमोफिलियासाठी फिजिओथेरपी देण्यासाठी आर्युवेद हॉस्पिटल कटीबध्द आहेत. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन दादा भालेकर तर आभार इंटास फाऊंडेशनचे सुरज माळी यांनी मानले.

## महेंद्र घरत यांचा महाराष्ट्र प्रदेशाध्यक्षांच्या हस्ते मुंबईत सत्कार

**अक्षराज : संग्राम ठाकूर**

**दि.२२, उरण (रायगड) :** गोरगरिबांच्या हाकेला धावून जाणारे, रायगड काँग्रेसला नवसंजिवनी देणारे काँग्रेस पक्षाचा एक आधार महेंद्रशेठ घरत यांचा नुकताच मुंबई सेंट्रल येथे काँग्रेसचे नवनिर्वाचित महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या हस्ते विशेष सत्कार करण्यात आला. यावेळी महेंद्रशेठ घरत यांच्या कार्याबद्दल सपकाळ यांनी गौरोदगार काढले व महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी अशा लढाऊ नेत्याच्या खंबीरपणे पाठिशी उभी राहणार असे सुतोवाच केले. यावेळी महेंद्रशेठ घरत हे विशेष निमंत्रित म्हणून उपस्थित होते. ते म्हणाले की, गांधींचे विचार आपण विसरलोय, मी विचारांशी बांधिलकी जपली, मी स्वतःला लोकांच्या सेवेत वाहून घेतले आहे. त्यामुळे कार्यकर्त्यांना बळ देतात. काँग्रेसला राहुल गांधींच्या विचारांचे हर्षवर्धन सपकाळ यांच्या रूपाने प्रदेशाध्यक्ष लाभलेत. त्यामुळे येणारा काळ काँग्रेसचाच असेल मुंबईतील बीआयटी चाळ येथील मैदानात रक्तदान शिबिर झाले. त्यावेळी महाराष्ट्र एस.टी. काँग्रेसचे सरचिटणीस श्रीरंग बरगे यांच्या पुढाकाराने झालेल्या रक्तदान शिबिराला उत्तम प्रतिसाद मिळाला. आंतरराष्ट्रीय कामगार नेते महेंद्रशेठ घरत हे दानशूर व्यक्तिमत्त्व असून काँग्रेसच्या तळागाळातील कार्यकर्त्यांना बळ देणारे नेते आहेत. असे एसटी काँग्रेसचे सरचिटणीस श्रीरंग बरगे यावेळी म्हणाले.उरण विधानसभा इंटक चे अध्यक्ष आणि महेंद्र घरत यांचे विश्वासू राजेंद्र भगत आणि माजी उरण उपतालुका प्रमुख घनश्याम पाटील यांनी रायगड जिल्हा अध्यक्ष महेंद्र घरत यांचे अभिनंदन केले.